cmyk

## संपादकीय

### पात्रतेची ऐशीतैशी...

निवडणुकीची धामधूम जोरात सुरू झाली आहे. अर्ज, माघारी, बंडोबा आणि थंडोबा अशी सगळी यातायात संपली आहे. सर्व पक्षांनी प्रचारावर भर दिला आहे. उमेदवार आणि त्यांचा 'नावलौकिक' यावर लोकांचा कटाक्ष आढळतो. तसेही कोणतीही निवडणूक जाहीर झाली की, उमेदवारीसाठीची पात्रता चर्चेत येते. लोकप्रतिनिधींसाठी पात्रता असावी की नाही यावर वादविवाद रंगतो. चर्चा झडतात.



दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४९ | मंगळवार दि.०६ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# २५ पिकांचे १८४ नवीन वाण प्रसारित

## अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत

नवी दिल्ली । वृतसंस्था

**केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी शेती अधिक फायदेशीर बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. सरकारने २५ शेतपिकांचे नवीन १८४ सुधारित वाण जारी केले आहेत. यात १२२ तृणधान्ये (६० भात वाण), ६ कडधान्ये, १३ तेलबिया, ११ चारा पिके, ६ ऊस, २४ कापूस (२२ बीटी कापसासह) आणि ज्यूट आणि तंबाखूच्या प्रत्येकी एक वाणाचा समावेश आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी नवी दिल्ली येथे हे नवीन वाण प्रसारित केले.**



आयसीएआर संस्था, राज्य तसेच केंद्रीय कृषी विद्यापीठे आणि खासगी बियाणे कंपन्यांनी हे वाण विकसित केली आहेत. ही सर्व हवामान सहनशील, उच्च उत्पादन देणारी आणि प्रमुख कीड आणि रोगांना प्रतिरोधक आहेत. हवामान बदल, क्षारपड जमीन, दुष्काळ आणि इतर जैविक आणि अजैविक ताण यासारख्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर टिकाव धरण्याच्या उद्देशाने हे नवीन वाण विकसित केले आहेत. तसेच ते नैसर्गिक आणि सेंद्रिय शेती पद्धतींसाठी अनुकूल असे आहेत, असे जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. या नवीन अधिक उत्पादन देणाऱ्या बियाण्यांच्या वाणांमुळे भरघोस पीक उत्पादन ◀◀ पान २ वर

> **"राज्यांतील शेतीसाठीचा रोडमॅप तयार करण्यासाठी सरकारने राष्ट्रीय रब्बी आणि खरीप परिषदेपूर्वी प्रादेशिक परिषदांसाठी ६ झोन तयार केले असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, सरकारचा येत्या संसद अधिवेशनात बियाणे विधेयक सादर करण्याचा विचार करत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले."**

# सरकारी नोकरीत मेरिटला प्राधान्य!

## ओपन कॅटेगरीच्या जागांवर एससी–एसटी–ओबीसीचाही हक्क; सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

नवी दिल्ली । वृतसंस्था

सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण आणि गुणवत्तेवर सुरू असलेल्या दीर्घकालीन वादाला सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत पूर्णविराम दिला आहे. आरक्षित प्रवर्गातील (एससी/एसटी/ओबीसी) उमेदवारांनी ओपन कॅटेगरीसाठी ठरवलेले कटऑफ गुण मिळवले असतील, तर त्यांना ओपन कॅटेगरीतील जागांवर नियुक्तीचा पूर्ण अधिकार आहे, असा स्पष्ट निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयाविरोधात दाखल करण्यात आलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली असून,



हा निकाल शेकडो उमेदवारांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

हे प्रकरण राजस्थान उच्च न्यायालयाच्या एका भरती प्रक्रियेशी संबंधित होते. राजस्थान हाय कोर्टाने काही ◀◀ पान २ वर

# लातूरमधून विलासरावांच्या आठवणी पुसल्या जातील!

## रवींद्र चव्हाण बरळले अन् वक्तव्यानंतर काँग्रेसचा संताप

लातूर । प्रतिनिधी

**भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी लातूरमध्ये केलेल्या एका वक्तव्यावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला आहे. भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता लातूरमधून विलासराव देशमुखांच्या आठवणी पुसल्या जातील यात शंका नाही असे रवींद्र चव्हाण बरळले. त्यांच्या या वक्तव्यावर काँग्रेसकडून निषेध व्यक्त केला जात आहे.**

लातूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप कार्यकर्त्यांच्या मेळाव्यासाठी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे शहरात आले होते. त्यावेळी त्यांनी काँग्रेसचे दिवंगत नेते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुखांवर एक वक्तव्य केल्यानंतर एकच खळबळ उडाली.



या मेळाव्यास भाजप नेते आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेश कराड, माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर यांची प्रमुख उपस्थिती होती. महापालिका निवडणुकीसाठीच्या भाजपच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यकर्त्यांना संबोधित ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### अमेरिकेचे उपराष्ट्रपती यांच्या निवासस्थानावर हल्ला

न्यूयॉर्कः अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे.डी. व्हॅन्स यांच्या सिनसिनाटी येथील निवासस्थानावर मध्यरात्री अज्ञाताकडून हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात घराच्या अनेक खिडक्यांच्या काचा फोडण्यात आल्या असून, या घटनेमुळे सुरक्षा यंत्रणांची मोठी धावपळ उडाली. याप्रकरणी पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना सिनसिनाटीमधील ईस्ट वॉलनट हिल्स भागातील व्हॅन्स यांच्या निवासस्थानी घडली. मध्यरात्री सुमारे १२:१५ च्या सुमारास सीक्रेट सर्व्हिसच्या एका अधिकाऱ्याने निवासस्थानाजवळ एका व्यक्तीला पूर्व दिशेला पळताना पाहिले. यानंतर तत्काळ स्थानिक पोलिसांना पाचारण करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि सीक्रेट सर्व्हिसचे पथक घटनास्थळी दाखल झाले. काही वेळातच एका संशयित व्यक्तीला परिसरातून ताब्यात घेण्यात आले.

### दिल्ली उच्च न्यायालयाकडून लालू यादवांना दणका

नवी दिल्ली : आयआरसीटीसी घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात बिहारचे माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांच्या याचिकेवर सोमवार दि. ५ जानेवारी रोजी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने लालू यादव यांच्या याचिकेवरील कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. उच्च न्यायालयाने सीबीआयला उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे. पुढील सुनावणी १४ जानेवारी रोजी होईल. लालू यादव यांनी कनिष्ठ न्यायालयाच्या त्या आदेशाला आव्हान दिले आहे, ज्यात त्यांच्याविरुद्ध आरोप निश्चित करण्यात आले होते. दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने १३ ऑक्टोबर रोजी लालू–राबडी आणि तेजस्वी यादव यांना आयआरसीटीसी घोटाळ्यात आरोपी मानले आहे. हे प्रकरण त्यावेळचे आहे जेव्हा लालू प्रसाद यादव केंद्र सरकारमध्ये रेल्वे मंत्री होते. आरोप आहे की, त्यांच्या कार्यकाळात आयआरसीटीसीअंतर्गत काही हॉटेल्स आणि त्यांच्याशी संबंधित जमिनी खासगी कंपन्यांना नियमांकडे दुर्लक्ष करून भाडेपट्ट्यावर देण्यात आल्या.

### टाटा मेमोरियलला बॉम्बने उडवून देण्याची धमकी

मुंबई : मुंबईतील टाटा मेमोरियल कॅन्सर रुग्णालयाला बॉम्बने उडवून देण्याची निनावी धमकी ई–मेलद्वारे प्राप्त झाल्याने शहरात मोठी खळबळ उडाली. हा ई–मेल सोमवारी सकाळच्या सुमारास रुग्णालय व्यवस्थापनाला प्राप्त झाला. यानंतर पोलीस प्रशासन आणि रुग्णालय व्यवस्थापन तातडीने सतर्क झाले. रुग्णालय परिसर रिकामा करून सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना केल्या गेल्या. मुंबई पोलिसांच्या अनेक पथकांनी घटनास्थळी धाव घेतली, तसेच बॉम्ब नाशक पथक आणि श्वान पथकही तातडीने दाखल झाले. परिसरातील प्रत्येक विभागाची बारकाईने तपासणी केली जात आहे, तर सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण रुग्णालयाच्या परिसरात सखोल शोधमोहीम राबवण्यात आली आहे.

### केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २% वाढीची शक्यता

दिल्लीः नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी आनंदाची बातमी आहे. नोव्हेंबरच्या अखिल भारतीय औद्योगिक श्रमिक ग्राहक किंमत निर्देशांक आकडेवारीनुसार, जानेवारी २०२६ पासून महागाई भत्त्यात २% वाढ होण्याची दाट शक्यता आहे. यामुळे सध्याचा ५८% वर असलेला डीए आता ६०% वर पोहोचेल. जर एखाद्या कर्मचाऱ्याचा मूळ पगार ५०,००० रुपये असेल, तर ५८% नुसार त्याला २९,००० रुपये डीए मिळत होता. आता ६०% प्रमाणे तो ३०,००० रुपये होईल, म्हणजेच दरमहा १,००० ची थेट वाढ होईल. तज्ज्ञांच्या मते, ८ व्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीपूर्वी डीए जितका जास्त वाढेल, तितकाच फायदा 'फिटमेंट फॅक्टर' ठरवताना होईल. यामुळे भविष्यात कर्मचाऱ्यांचा मूळ पगार आणि पेन्शनमध्ये मोठी वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### डेरा प्रमुख राम रहीम १५ व्यांदा तुरुंगाबाहेर

रोहतकः येथील सुनारिया कारागृहात साध्वींच्या लैंगिक शोषणाच्या आणि पत्रकाराच्या हत्येच्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला डेरा सच्चा सौदा प्रमुख गुरमीत राम रहीम पुन्हा एकदा तुरुंगातून बाहेर आला आहे. त्याला ४० दिवसांची पॅरोल मिळाली आहे. गुरमीत राम रहीम याला घेण्यासाठी सिरसा डेऱ्यातून आलिशान गाड्यांचा ताफा पोहोचला, ज्यात दोन बुलेटप्रूफ लँड क्रूझर, २ फॉर्च्युनर आणि २ इतर गाड्यांचा समावेश होता.

# दिल्ली दंगलीतील आरोपींचा जामीन कोर्टाने फेटाळला



नवी दिल्ली । वृतसंस्था

राजधानी दिल्लीमध्ये २०२० मध्ये झालेल्या दंग्यात कथित सहभाग असल्याच्या आरोपावरून गेल्या ५ वर्षांपासून तुरुंगात असलेले विद्यार्थी उमर खालिद आणि शरजील इमाम यांना सोमवारी सर्वोच्च न्यायालयात मोठा धक्का बसला आहे. या दोघांविरोधात प्रथमदर्शनी पुरावे असल्याचे निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने त्यांना जामीन नाकारला आहे. तर या प्रकरणातील इतर पाच आरोपांनी कोर्टाने जामीन मंजूर केला आहे. सध्या तुरुंगात असलेल्या उमर खालिद आणि शरजिल इमामच्या जामीन अर्जावर न्यायमूर्ती अरविंद कुमार ◀◀ पान २ वर

# बोंबला ! राज्य सरकारकडून वीज क्षेत्राच्या खासगीकरणाची प्रक्रिया सुरू

## १३ मंडळांत फ्रेंचायझी ; वीज कामगार संघटना आक्रमक

नागपूर । प्रतिनिधी

**महावितरणचे कोणत्याही परिस्थितीत खासगीकरण करणार नाही, या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनाला हरताळ फासत राज्य सरकारने १३ मंडळांमध्ये फ्रेंचायझी नेमण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे वीज कामगार संघटना आक्रमक झाल्या असून, त्यांनी मुख्यमंत्र्यांवर 'वचनभंगा'चा गंभीर आरोप केला आहे.**

४ जानेवारी २०२३ रोजी वीज कामगारांच्या संपानंतर मुख्यमंत्र्यांनी वीज क्षेत्राच्या सक्षमीकरणाचे आश्वासन दिले होते. मात्र, आता महावितरणने फ्रेंचायझी दिलेल्या मंडळांमध्ये जालना, छत्रपती संभाजीनगर (शहर व ग्रामीण), नांदेड, परभणी, हिंगोली, वाशीम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, सोलापूर, धाराशिव व बीड या शहरांचा समावेश आहे. वीज वितरणाची जबाबदारी खासगी कंपन्यांना (फ्रेंचायझी) देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनच्या मते, हे अप्रत्यक्षपणे खासगीकरणच असून यामुळे जनतेचे आणि कर्मचाऱ्यांचे ◀◀ पान २ वर



> **या मंडळांचा समावेश...**
>
> महावितरणने फ्रेंचायझी दिलेल्या मंडळांमध्ये जालना, छत्रपती संभाजीनगर (शहर व ग्रामीण), नांदेड, परभणी, हिंगोली, वाशीम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, सोलापूर, धाराशिव व बीड या शहरांचा समावेश आहे. वीज वितरणाची जबाबदारी खासगी कंपन्यांना (फ्रेंचायझी) देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

# महायुतीकडून मतदानाआधीच घोडेबाजार

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत मुक्त आणि पारदर्शक निवडणुकीच्या धोरणाला हरताळ फासला आहे. पैशाचा खेळ व सत्तेचा बेफाम गैरवापर करून सत्ताधाऱ्यांनी लोकशाही गुंडाळून ठेवली आहे. मतदानाआधीच घोडेबाजार सुरु झाला आहे अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारीला ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.५ जानेवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४४.०० क्विंटल | २,४०० | २,९५१ | २,६६६ |
| ज्वारी/हायब्रिड : ३५.५० क्विंटल | १,७०० | ३,९९० | ३,१५५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८४.०० क्विंटल | ५,३०१ | ७,७०० | ६,७९७ |
| उडीद : ६.०० क्विंटल | ६,१०१ | ६,२०० | ६,१५० |
| बाजरी: ३१.५० क्विंटल | २,४२० | ३,३०० | २,८१३ |
| मुग: १.०० क्विंटल | ५,३०१ | ५,३०१ | ५,३०१ |
| सोयाबीन: १२३.५० क्विंटल | ४,१३० | ४,८१५ | ४,६९३ |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ४,३०० | ५,४१० | ४,९६५ |

# बिनविरोध निवडून आलेले लटकणार!

## मनसेची, काँग्रेसची हायकोर्टात धाव, अ‍ॅड.असीम सरोदेंनीही केला विरोध

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजप–शिवसेना (शिंदे गट) महायुतीच्या तब्बल ७० जागा बिनविरोध निवडून आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. मात्र, हा विजय लोकशाही मार्गाने नसून, धमक्या आणि पैशांच्या जोरावर मिळवल्याचा आरोप करत मनसे आणि काँग्रेसने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकेमुळे आता बिनविरोध निवडणुकांच्या निकालावर टांगती तलवार निर्माण झाली आहे.**




मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी पत्रकार परिषदेत खळबळजनक पुरावे सादर केले आहेत. ठाणे आणि कल्याण–डोंबिवलीत उमेदवारांना धमकावून किंवा पैशांचे आमिष दाखवून त्यांचे अर्ज मागे घेण्यास भाग पाडले गेले, असा दावा जाधव यांनी केला आहे. इतकेच नव्हे तर, सोलापूरमध्ये मनसे नेते बाळासाहेब सरवदे यांची हत्या ही देखील अर्ज माघारी घेण्याच्या वादातून झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. अविनाश जाधव यांच्या म्हणण्यानुसार, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी या संपूर्ण प्रकरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. लोकशाहीत जनतेला मतदानाचा अधिकार मिळणे आवश्यक असताना साम–दाम–दंड–भेदाचा वापर करून निवडणुका बिनविरोध करणे हे घातक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, या प्रकरणावर अ‍ॅड. असीम सरोदे यांनी भाष्य केले असून, त्यांनी या प्रक्रियेवर कायदेशीर प्रश्नचिन्ह ◀◀ पान २ वर

# अंधश्रध्देवर आधारीत भीतीवर कारवाईचा अधिकार नाही

चेन्नई । वृत्तसंस्था

एखाद्या व्यक्तीला स्वत:च्या जागेत कोणतीही मूर्ती ठेवून मित्र आणि शेजाऱ्यांना आमंत्रित करून शांततेने पूजा करायची असेल, तर जनता बहुमताच्या जोरावर कायदा हातात घेऊ शकत नाही. राज्य सरकार अंधश्रद्धा किंवा अशास्त्रीय सार्वजनिक भीतीवर आधारित कारवाई करू शकत नाही असा महत्त्वपूर्ण निकाल नुकताच मद्रास उच्च न्यायालयाने दिला आहे.

उत्तर चेन्नईतील रहिवासी ए. कार्तिक यांनी त्यांच्या घरात शिवशक्ती दक्षिणेश्वरी, विनायक आणि वीरभद्र या देवतांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली होती. ही पूजा प्रामुख्याने खासगी स्वरूपाची होती, परंतु परिसरातील काही लोकही त्यात सहभागी होत असत. मात्र, या मूर्तींच्या स्थापनेनंतर परिसरात काही अनैसर्गिक मृत्यू झाल्याचा आरोप करत स्थानिक रहिवाशांनी ◀◀ पान २ वर

> **कारवाईचे समर्थन नाही–उच्च न्यायालय**
>
> न्यायमूर्ती डी. भरत चक्रवर्ती यांनी स्पष्ट केले की, अधिकाऱ्यांनी केलेली कारवाई कायद्याने, धार्मिक श्रद्धा किंवा 'विज्ञान'च्या कोणत्याही तत्त्वाने समर्थित नाही. भारतीय संविधानानुसार राज्यावर जनतेमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याची जबाबदारी आहे.

cmyk

## अग्रलेख

# पात्रतेची ऐशीतैशी...

निवडणुकीची धामधूम जोरात सुरू झाली आहे. अर्ज, माघारी, बंडोबा आणि थंडोबा अशी सगळी यातायात संपली आहे. सर्व पक्षांनी प्रचारावर भर दिला आहे. उमेदवार आणि त्यांचा 'नावलौकिक' यावर लोकांचा कटाक्ष आढळतो. तसेही कोणतीही निवडणूक जाहीर झाली की, उमेदवारीसाठीची पात्रता चर्चेत येते. लोकप्रतिनिधींसाठी पात्रता असावी की नाही यावर वादविवाद रंगतो. चर्चा झडतात. निवडणूक संपली की चर्चाही विरते. अपवाद फक्त निवडणूक आयोगाचा करता येऊ शकेल. कारण आयोगाने उमेदवारांकडून जे शपथपत्र लिहून घेतले ते एक प्रकारचे सामाजिक निकषच मानले जाऊ शकेल.

उमेदवार किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने अवैध बांधकाम केलेले नसावे, निवडून आल्यावर मनपाचे कोणतेही शासकीय कंत्राट घेणार नाही, कोणताही भ्रष्ट मार्ग स्वीकारणार नाही हे त्यापकी काही. गंमत म्हणजे मी शौचालयाचा वापर करतो अशी अटही त्यात नमूद आहे. म्हणजे सर्वपक्षीय उमेदवारांनी तसे शपथपत्र लिहून दिले आहे हे विशेष. लोकांना तरी हे पक्ष आणि त्यांच्या उमेदवारांचे ढोंगच वाटत असणार. हातातल्या बेड्यांसहित पुण्यात निवडणूक अर्ज भरायला आलेला उमेदवार पाहून मतदार केवळ थक्कच होऊ शकतात. तोंडावर काळे कपडे घातलेल्या आणि गुन्हेगारीचा गंभीर आरोप असणार्याला अर्ज भरण्यासाठी बंदोबस्तात आणताना केवळ पोलिसच नव्हे तर मतदारांनाही हतबल वाटले असणार. कारण राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण हा सामाजिक चिंतेचा विषय आहे. न्यायसंस्थेने देखील अनेकदा त्याबद्दल चिंता व्यक्त केलेली आढळते. हेच निर्ढावलेपण मग शपथपत्र लिहून देताना उपयोगी पडत असावे. राजकारण आणि सत्ताकारण म्हणजे सात पिढ्यांच्या कोटकल्याणाचा मार्ग मोकळा असेच मानले जाते. लोकांच्याही तेच अनुभवास येते. सरकारी कंत्राटे घेतल्याशिवाय किंवा घेऊन दिल्याशिवाय ते शय होऊ शकत असेल का? अतिक्रमण केल्याशिवाय इमले उभे राहू शकत असतील का? उरफोड करूनही सामान्य माणसांची आर्थिक परिस्थिती बदलत नाही.

राजकारण्यांना अशी कोणती जादूची कांडी गवसते कि सत्तेत गेल्यानंतर तथाकथित कार्यकर्ते श्रीमंत होतात? असा प्रश्न लोकांना नेहमीच सतावतो. राजकारणात सुसंस्कृतता आढळत नाही अशी खंत तमाम ज्येष्ठ राजकारणी वेळोवेळी व्यक्त करतात. तोही उपचारच ठरतो. कारण सुसंस्कृतता टिकवण्याची जनता त्यांच्यावरच सोपवते. किती नेते ती पार पाडतात? गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकांना उमेदवारी देण्यात सगळेच पक्ष आघाडीवर आढळतात. राजकारण्यांची विश्वासार्हता इतकी रसातळाला गेली आहे की, शपथपत्रातील अपेक्षा पूर्ण करणारा उमेदवार असू शकेल यावर लोकांचा विश्वासच नाही. मग शपथपत्र प्रभावहीनच ठरणार. शपथपत्र म्हणजे लोकांच्या अपेक्षांचे प्रतिबिंबच आहे. पण त्या अटी कारवाईशी जोडल्या गेलेल्या नाहीत. म्हणजे एखाद्या उमेदवाराने शपथपत्रात खोटी माहिती दिली तर त्याच्यावर कोणती कारवाई होईल? त्याने भरून दिलेल्या माहितीची खातरजमा केली जाते का? माहिती खोटी सिद्ध झाली तर त्याचे लोकप्रतिनिधित्व रद्द केले जाईल का? तसे झाले तर त्या निवडणुकीचा सरकारी खर्च वाया गेला असे समजायचे का? मग ते नुकसान कोण भरून देणार? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्याची उत्तरे कोण देणार? त्यामुळेच गुन्हेगारी पार्श्वभूमीचे उमेदवार देखील बिनदिक्कत शपथपत्र लिहून देतात. तसेही कारवाई केल्याचे कोणतेही उदाहरण आढळत नसल्याने शपथपत्र म्हणजे निव्वळ उपचार बनला असावा का? निवडणूक लढवणार्या उमेदवारांची माहिती मतदान केंद्रांवर लावली जाते. त्यांच्यावर किती पोलिस केस आहेत हेही त्यात असते. या सगळ्या बाबतीत जनतेची अवस्था मात्र 'उडदामाजी काळे गोरे' अशीच होते. मुद्दा किंवा समस्या शपथपत्रात अटींचा नाहीच आहे. जनता त्या अटी योग्य ठरवेल; पण त्या पाळल्या गेल्या नाही तर काय, याचे उत्तर जनतेला समाधानकारक मिळत नाही. म्हणूनच कदाचित लोक त्या अपेक्षांची चेष्टा करत असावेत. निवडून येण्याची क्षमता हाच सक्रिय राजकारणाचा निकष बनला आहे. अर्थबळाशिवाय ते शय होऊ शकत असेल का? म्हणजेच ते बळ असणार्या व्यक्ती जनतेची अन्य कुठलीही अपेक्षा पूर्ण करत नसल्या तरी पक्षांचे फारसे काही अडत नसावे.

# वृत्तपत्रांचा प्रवासआजपर्यंतचा !




**बदलत्या काळासोबत ज्याला बदलणे जमले त्यालाचा यश प्राप्त करणे सोपे असते. याचा व्यक्तीप्रमाणे माध्यम क्षेत्राचा विस्तार आणि आजची स्थिती याचं एक चिंतन आणि येणाऱ्या काळातील बदलाचा वेध आणि याचं निमित्त अर्थात दर्पण दिन.**

सिंधुदूर्ग जिल्ह्यात जन्म झालेल्या बाळशास्त्री जांभेकर यांचा कार्यालेख खरोखरच अफाट आहे. मराठी माणसांनी जन्म दिलेल्या दोन व्यवसायांनी नंतर उत्तुंग अशी भरारी घेतली. यात दर्पणकार जांभेकर यांनी मुहूर्तमेढ केल्यानंतर वृत्तपत्र व्यवसाय एक आहे. सोबत स्मरण करावे असा व्यवसाय म्हणजे दादासाहेब फाळके यांनी सुरू केलेला चित्रपट व्यवसाय याचीही आठवण आपण ठेवली पाहिजे. या दोन्ही व्यवसायांवर आज लाखो कुटूंबे अवलंबून आहेत. इतकेच नव्हे तर देशाला दिशा आणि नेतृत्व देणारी व्यक्तीमत्वे ही याचा मधून आपणासमोर आली आहेत. राष्ट्रपिता महात्मा गांधी, संविधान देशाला देणारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच देशाचे पंतप्रधान राहिलेले दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या आरंभिक काळात वृत्तपत्रांची भूमिका महत्वाची होती. कधी काळी केवळ मुद्रीत माध्यम आणि त्यासोबत रेडिओ हे माध्यम होते त्यातही रेडिओवर शासकीय नियंत्रण असलेला काळ होता त्यामुळे मुद्रीत माध्यमाला अधिक महत्व होते. नंतरच्या काळात टेलीव्हिजन चॅनेलचा प्रारंभ झाला त्यातही अनेक वर्षे देशात शासन यंत्रणेची माध्यमे म्हणून त्याकडे बघितले जात होते. त्याकाळातही मुद्रीत माध्यमाचे महत्व कायम राहिले. नंतर ९० च्या दशकात वाहिन्यांची सुरूवात झाली. आज आपण याचा प्रवास बघितला तर तो थक्क करणारा असा आहे. आजच्या तारखेस देशात सर्व भाषांची मिळून ११५० चॅनेल्स आहेत आणि यातील केवळ वृत्तप्रधान वाहिन्यांची संख्या ४३३ इतकी आहे. एकूण चॅनेल संख्येच्या ४० टक्के असे प्रमाण होते. यात सर्वाधिक २११ वाहिन्या हिंदी भाषी असून मराठी वृत्तवाहिन्यांची संख्या १४ आहे. वाहिन्यांची संख्या वाढली त्यानंतर नवमाध्यमांचा उदय झाला असे असले तरी आजही मुद्रीत माध्यमाला असणार माध्यम महत्व आजही तितकेच आणि कारण आपल्या देशात आजही 'लिहिलेल्या आणि छापलेल्या' शब्दांवर' सर्वांचा विश्वास आहे.

मुद्रीत माध्यमे संपणार अशी ओरड सुरू झाली, मात्र त्यानंतरही आजवर या माध्यमांचा विस्तार सुरूच आहे. एक पिढी वयात येताना दुसरी पिढी जन्म घेतेय अशा आपल्या विस्तीर्ण आसेतू हिमालय अशा भारत देशात नवे वृत्तपत्र दाखल होते. त्यावेळी ते आधीच्या वृत्तपत्रांवर फारसा परिणाम करत नाही याचं कारण म्हणजे प्रत्येक वृत्तपत्र आपला नवा वाचकवर्ग घेऊन येतो. मात्र नवमाध्यमांनी सर्वांना बदलणे आवश्यक आहे असा स्पष्ट संदेश दिला आहे. यानुसार बड्या वृत्तपत्रांनी आपल्या ऑनलाईन आवृत्त्या सुरू केल्या आहेत. त्यातूनही व्यवसाय वृद्धी होईल असा होरा बांधून त्याची ऑनलाईन वर्गणी भरून वर्गणीदार केले जात आहेत असे सध्याचे चित्र आहे. मात्र झपाट्याने माहिती समोर आणणाऱ्या या काळात सशुल्क ऑनलाईन वृत्तपत्र विक्री त्यांना यापुढील काळात प्राप्त होईल याची खात्री नाही. वृत्तपत्राला त्याच्या ऑनलाईन उपस्थिती ती देखील मोफत ठेवून त्याच्या आधारे डिजिटल मार्केटींग मधून व्यवसाय हा उत्तम पर्याय आहे. हे ज्यांना कळले त्यांचे भविष्य दोन्ही बाजूंनी चांगले राहणार आहे.

कोणत्याही तंत्राचे फायदे जसे असतात तसे तोटेही असतात. नवमाध्यमे वापरताना त्यात अनेक जण विविध पद्धतीने वापरतात यामुळे युट्यूब चॅनेलचे पेव आलेले आपणास दिसते. याला नेमके अधिष्ठान नाही. परिणामी या माध्यमांचा मुळ प्रवाहात प्रवेश होणे अवघड आहे. त्यांना मान्यता मिळण्याची शक्यता सध्या नाही आणि भविष्यात ती झाली तरी त्यावर नियंत्रण ही समस्या ठरू शकते.

इन्स्टाग्राम आणि फेसबूक व (ट्विटर )आताचे एक्स या माध्यमांचा वापर वेगळा हेतू,वेगळा आणि गती देखील वेगळीच आहे. त्यात क्षणभंगूरता अधिक प्रमाणात आहे. त्यात 'एन्फ्लचुएन्सर' होण्याचे भाग माध्यमांना अशक्य असे आहे. कधी काळी असणारी पत्रकारीता व्यावसायिक स्पर्धेने पूर्णपणे बदलून टाकली आणि ग्रामीण भागात याचे चित्र अगदीच वेगळे झालेले आहे. यातील व्यावसायिक भाग सोडला तर आजही ही वृत्तपत्रे एका अर्थाने समाजाला मार्ग दाखवण्याचे काम करीत आहे. आपल्या देशात ३ स्तंभ अर्थात सेना, न्यायालय आणि शासन यंत्रणा यांना मान्यता आहे. माध्यमांनी यात 'समाज प्रहरी' म्हणून आपले स्थान चौथा स्तंभ स्वरूपात उभे केले आहे. त्याचाही गौरवपूर्ण उल्लेख दर्पण दिना निमित्त करून दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचे स्मरण करू आणि आगामी काळात देखील हे माध्यम दीपस्तंभासारखे सर्वांना मार्गदर्शन करेल अशी अपेक्षा करूया.



**प्रशांत दैठणकर**

# घर, पाणी, उद्योग आणि रोजगार : जालन्याच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प–मुख्यमंत्री फडणवीस

## जालना मराठवाड्याची आर्थिक राजधानी; शहराच्या विकासासाठी कटिबद्ध–रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी**

**शहराच्या विकासासाठी घर, पाणी, रस्ते, उद्योग, रोजगार, ऊर्जा आणि सुरक्षा या सर्व बाबींवर सरकारचा स्पष्ट दृष्टिकोन असल्याचे ठामपणे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यत्री फडवणीस जालना येथे महानगरपालिका निवडणूक भाजपच्या प्रचार सभेसाठी आले असता यावेळी ते बोलत होते''येत्या काळात जालन्यातील एकही कुटुंब कच्च्या घरात राहणार नाही, हा आमचा ठाम आणि अढळ संकल्प आहे,'' असे सांगत त्यांनी शहरातील झोपडपट्टीधारक व गरजू कुटुंबांना हक्काचे घर मिळवून देण्याची हमी दिली. यासाठी जालन्यात जमिनीच्या मालकी हक्काचे पट्टे वाटप करण्याच्या कामांना येत्या काळात मोठ्या प्रमाणावर गती दिली जाणार असून, शहरात जितकी घरांची मागणी असेल तितकी घरे राज्य सरकारच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जातील, असे स्पष्ट आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**




गरीब, मध्यमवर्गीय आणि कामगार वर्गाच्या जीवनमानात परिवर्तन घडवण्याचा हा महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर भर देताना लाडक्या बहिणींसाठी जालन्यात 'उमेद मॉल'ला मंजुरी देण्यात आल्याची घोषणा केली. महिलांना स्वयंरोजगार, उद्योजकता आणि आर्थिक स्वावलंबनाच्या संधी मिळाव्यात, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. शेवटी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जालनावासियांना आवाहन करताना सांगितले की, ''आता जालन्यात भाजपाचा झेंडा फडकवायचा आहे. येत्या १५ तारखेला जालनावासियांनी कमळाची काळजी घ्यावी. पुढील पाच वर्षे जालना शहराची काळजी घेण्याची जबाबदारी आमची असेल.'' जालना

## भाजपकडे विकासाचे स्पष्ट व्हिजन; महापालिकेत १०० टक्के भाजपाची सत्ता येणार–आ. लोणीकर

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या भव्य जाहीर प्रचार सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित जालनावासियांना संबोधित करत जालना शहराच्या उज्ज्वल भवितव्याचा सविस्तर आणि दूरदृष्टीपूर्ण विकास आराखडा मांडला. या सभेला माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार व माजी मंत्री बबनराव लोणीकर, उद्योगपती घनश्यामजी गोयल, आमदार नारायण कुचे आमदार संतोष दानवे माजी आमदार कैलास गोरंट्याल माजी आमदार विलासराव खरात भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे यांच्यासह भाजपाचे वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जालना शहराच्या औद्योगिक विकासावर बोलताना माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी सांगितले की, जालना येथील ड्राय पोर्ट आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गामुळे जालना हे स्टील आणि पोलाद उद्योगाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून वेगाने पुढे येत आहे. यामुळे स्थानिक तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. छत्रपती संभाजीनगरजालना हा संपूर्ण परिसर आता उद्योगांना आकर्षित करत असून, जालन्यामध्ये शाखा, रिंग रोड, अंतर्गत रस्त्यांसाठी भरीव निधी, रेल्वे स्थानकाचा विकास, वैद्यकीय महाविद्यालय, जालनाखामगाव रेल्वेमार्ग यांसारखी अनेक महत्त्वाची विकासकामे मार्गी लावण्यात आली आहेत. या पायाभूत सुविधांमुळे जालना शहराचे औद्योगिक व शैक्षणिक महत्त्व अधिक वाढणार असल्याचे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी सांगितले. जालन्यातील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर आमदार बबनराव लोणीकर यांनी सविस्तर माहिती देताना सांगितले की, मागील काळात १५० कोटी रुपयांची भव्य पाणीपुरवठा योजना मंजूर करून तिची अंमलबजावणी करण्यात आली आहे. पाईपलाईनचे काम पूर्ण झाले असून ८ जलकुंभ कार्यान्वित झाले आहेत. जालना महानगरपालिका १०० टक्के भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात येईल. आमच्याकडे केवळ घोषणा नाहीत, तर विकासाचा स्पष्ट आणि ठोस अजेंडा आहे.'' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली जर जालना महानगरपालिका भाजपाच्या ताब्यात आली, तर जालन्याला मराठवाड्यातील सर्वात टॉप शहर बनवण्याचा संकल्प पूर्ण केला जाईल.

# होय, व्यसनमुक्ती शक्य आहे-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

व्यसन ही केवळ सवय नसून ती शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आयुष्यावर खोल परिणाम करणारी गंभीर समस्या आहे. व्यसनामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असूनही संबंधित व्यक्ती त्या सवयीतून बाहेर पडू शकत नाही, अशी व्यसनाची व्याख्या करत ''होय, व्यसनमुक्ती शक्य आहे'' असा ठाम विश्वास मानसोपचार तज्ज्ञ डॉ. जगदीश टेकाळे यांनी व्यक्त केला.



दारू हे शरीरासाठी अत्यंत घातक व्यसन असून त्यामुळं अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाल्याची असंख्य उदाहरणे समाजात दिसतात. दारूच्या अति सेवनामुळे यकृत (लिव्हर) खराब होणे, किडन्या निकामी होणे, अपंगत्व येणे तसेच अनेकांचा मृत्यू होतो, असे त्यांनी सांगितले.

**व्यसनांचे दुष्परिणाम :** कोणत्याही प्रकारच्या व्यसनांचे परिणाम केवळ शारीरिकच नाहीत तर मानसिक, व्यवहारिक व सामाजिक पातळीवरही गंभीर स्वरूपाचे असतात.

**शारीरिक दुष्परिणाम :** सिगारेट, दारू, मादक पदार्थ, मावा (सुगंधी तंबाखू) यांमुळे दात, घसा, फुफ्फुसे, हृदय, पचनसंस्था, मूत्रपिंडे यांचे गंभीर विकार होतात. अनेकांना कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारांना सामोरे जावे लागते. काही रुग्णांना डायलिसिसवरही अवलंबून राहावे लागते.

**मानसिक दुष्परिणाम :** व्यसनामुळे मन व बुद्धी अकार्यक्षम होऊन चिंता, नैराश्य, विस्मरण, स्मृतिभ्रंश यांसारखे त्रास निर्माण होतात. आनंद व दुःख यातील टोकाचे बदल (मूड स्विंग्स), आक्रमकता, संशयी वृत्ती वाढते. व्यसन म्हणजे मानसिक आरोग्यावर पडलेले खग्रास ग्रहण असून निरोगी व्यक्ती मानसिक रुग्ण बनू शकते.

**व्यवहारिक दुष्परिणाम :** शिक्षणात अपयश, नोकरी न मिळणे, व्यवसायात तोटा, घरगुती वाद, विवाहात अडचणी, दारिद्र्य, वारंवार आजारपण अशा समस्या व्यसनामुळे उद्भवतात.

**सामाजिक दुष्परिणाम :** व्यसनाच्या आहारी गेलेली व्यक्ती योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक याचा विचार न करता चोरी, गुन्हेगारी कृत्यांकडे वळू शकते. समाजातील प्रतिष्ठा घसरते व त्या व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. डॉ. टेकाळे यांनी स्पष्ट केले की, ''प्रत्येक व्यसनी व्यक्ती मुळात चांगलीच असते; व्यसनामुळे फक्त तिच्या वागण्यात बदल दिसून येतो.''

**व्यसनमुक्ती उपचार :** व्यसनमुक्तीसाठी सर्वप्रथम डीटॉक्सिफिकेशन आवश्यक असते. शरीरात साचलेले व्यसनाचे रसायन, द्रव किंवा घातक घटक बाहेर काढणे ही उपचारांची पहिली पायरी आहे. यासोबतच कौटुंबिक पाठबळ अत्यंत महत्त्वाचे आहे. कुटुंबीयांनी व्यसनी व्यक्तीशी कसे वागावे, कसे संवाद साधावा याचे योग्य मार्गदर्शन मिळाल्यास अनेक जण व्यसनातून बाहेर पडू शकतात, असे त्यांनी नमूद केले. ही माहिती डॉ. जगदीश श्रीराम टेकाळे (एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार, गोल्ड मेडलिस्ट), न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ज्ञ व सेक्सोलॉजिस्ट यांनी दिली. ते दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई गावते कॉम्प्लेक्स, डी.पी. रोड, डॉक्टर लाईन, बस स्टँडच्या पाठीमागे येथे रुग्णांसाठी उपलब्ध असतात.

# पान १ वरून...

## २५ पिकांचे १८४

मिळेल. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असा विश्वास कृषिमंत्री चव्हाण यांनी व्यक्त केला आहे. हे नवीन वाण शेतकऱ्यांपर्यंत त्वरित पोहोचतील याची खात्री करण्याचे निर्देश त्यांनी मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. देशाने उच्च उत्पादन देणारी बियाणे वाण विकसित करण्यात मोठे यश मिळवले असल्याचे त्यांनी नमूद केले. राजपत्र अधिसूचना प्रक्रिया १९६९ मध्ये सुरू झाल्यापासून एकूण ७,२०५ पीक वाण अधिसूचित करण्यात आले आहेत. यात भात, गहू, ज्वारी, मका, डाळी, तेलबिया, तंतुमय पिकांचा समावेश आहे. कृषिमंत्री चौहान यांनी पुढे म्हटले आहे की, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात ३,२३६ उच्च उत्पादन देणाऱ्या शेतपीक वाणांना मंजुरी देण्यात आली. १९६९ ते २०१४ दरम्यानच्या काळात ३,९६९ वाण अधिसूचित करण्यात आले होते. कधी काळी देशात अन्नाची टंचाई होती. आता भारत जागतिक धान्य पुरवठादार बनला आहे. हा मोठी कामगिरी असल्याचे त्यांनी नमूद केले.

-----------

## लातूरमधून विलासरावांच्या

करताना रवींद्र चव्हाण म्हणाले की, कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून लक्षात येते की, लातूर शहरातून विलासराव देशमुखांच्या आठवणी पुसल्या जातील, यात काही शंका नाही. रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यावर हर्षवर्धन सपकाळांनी म्हणाले की, स्व. विलासराव देशमुख साहेबांच्या आठवणी लातूर जिल्ह्यातून पुसू शकणारा अजून कोणी निर्माण नाही झाला. अनेक जण इच्छा बाळगून आले आणि स्वाभिमानी लातूरकरांनी त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. विलासराव देशमुख यांनी लातूर जिल्ह्याला राष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून दिली, त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य लातूरच्या विकासासाठी समर्पित केले. आज त्यांच्याबद्दल हे सत्तेचा माज असलेले भाजप नेते लातूरात येऊन बरळून जातात की साहेबांच्या आठवणी पुसल्या गेल्यात. त्यांना काय समजणार विलासराव देशमुख साहेबांचे लातूरशी असलेले नातें. लातूरच्या कर्तुत्वसंपन्न सुपुत्राचा अपमान लातूरकर कधीही सहन करणार नाही, भाजपवाल्यांनो याद राखा, करारा जवाब मिलेगा!

---------

## सरकारी नोकरीत मेरिटला

पदांच्या भरतीदरम्यान असा नियम लागू केला होता की, आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना ओपन कॅटेगरीतील जागांवर नियुक्त करता येणार नाही, जरी त्यांचे गुण ओपन कॅटेगरीतील उमेदवारांपेक्षा जास्त असले तरीही. हा दुहेरी लाभ ठरेल, असा युक्तिवाद राजस्थान हाय कोर्टाने केला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला. न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि ऑगस्टीन जी. मसीह यांच्या खंडपीठाने राजस्थान उच्च न्यायालयाचा निर्णय चुकीचा ठरवत याचिका नामंजूर केली. प्रत्येक बाबतीत गुणवत्तेला सर्वोच्च स्थान दिले गेले पाहिजे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. राजस्थान हाय कोर्टाचा युक्तिवाद फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने १९९२ मधील इंदिरा साहनी प्रकरणाचा संदर्भ दिला. न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'ओपन' या शब्दाचा अर्थच सर्वांसाठी खुला असा आहे. ओपन कॅटेगरीतील जागा कोणत्याही विशिष्ट जात किंवा वर्गासाठी राखीव नसून, त्या सर्व पात्र उमेदवारांसाठी उपलब्ध असतात. या निर्णयामुळे सरकारी नोकऱ्यांमधील भरती प्रक्रियेत मेरिटचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, आरक्षण आणि गुणवत्तेतील समतोलाबाबत महत्त्वाचा न्यायनिवाडा समोर आला आहे.

--------------

## महायुतीकडून मतदानाआधीच

मतदान होत आहे. मात्र, प्रत्यक्ष निवडणुकीपूर्वी अनेक ठिकाणी महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या पार्श्वभूमीवर आज पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ यांनी महायुतीवर जोरदार टीका केली. निकोप लोकशाहीत विरोधी पक्षांनाही तेवढेच महत्व आहे. पण आता विरोधकच नको अशी प्रवृत्ती भाजप आणि महायुतीची बनली असून त्यातून बिनविरोधसाठी सत्ताधारी कोणत्याही स्तराला जात आहेत. विरोधी पक्षांच्या उमेदवाराला अर्ज भरू न देणे, धमक्या देणे, दबाव तंत्राचा वापर करणे असा पोलिस, प्रशासनाच्या मदतीने बेशरमपणाचा खेळ सुरु आहे. निवडणूक आयोग मात्र याचा मूक साक्षीदार बनला आहे, अशी खंत सपकाळ यांनी व्यक्त केली.

------------

## बोंबला ! राज्य सरकारकडून वीज

नुकसान होणार आहे. फेडरेशनचे अध्यक्ष मोहन शर्मा यांनी सांगितले की, यापूर्वी छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि जळगावमध्ये फ्रेंचायझी मॉडेल पूर्णपणे अपयशी ठरले आहे. अनेक कंपन्या कराराची मुदत संपण्यापूर्वीच पळून गेल्याची उदाहरणे आहेत. तरीही केवळ कॉर्पोरेट कंपन्यांच्या फायद्यासाठी हा हट्ट का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. महावितरण सध्या ४७८ कोटी, महापारेषण १५०० कोटी आणि महानिर्मिती १०० कोटी रुपयांच्या नफ्यात आहेत. सामाजिक उत्तरदायित्व म्हणून ही कंपनी शेतकरी आणि गोरगरिबांना सवलतीच्या दरात वीज देते. खासगी फ्रेंचायझी आल्यास हा सामाजिक दृष्टीकोन संपुष्टात येईल, अशी भीती व्यक्त होत आहे. या निर्णयाविरोधात आता कामगार संघटना आणि सरकारमध्ये तीव्र संघर्षाची चिन्हे दिसत आहेत. दरम्यान, 'फ्रेंचायझी' मॉडेलमध्ये वीज वितरणाचे काम ठराविक कालावधीसाठी खासगी कंपनीकडे दिले जाते. वीज निर्मिती ही सरकारी व खासगी कंपन्यांकडून होते आणि वीज वहन (ट्रान्समिशन) महापारेषणकडेच राहते. मात्र ग्राहकांपर्यंत वीज पोहोचवणे, बिलिंग व वसुलीची जबाबदारी खासगी फ्रेंचायझीकडे असते.

--------------

## दिल्ली दंगलीतील आरोपींचा

आणि एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी सुनावणीस सुरुवात होण्यापूर्वीच पाच वर्षांहून अधिक काळ आरोपींना तुरुंगात ठेवण्यात आल्याच्या मुद्द्याला आधार बनवत बचाव पक्षाने उमर खालिद आणि शरजिल इमाम यांना जामीन देण्याची मागणी केली. मात्र राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक व्यवस्थेवर विचार करणे या बाबी आरोपींना दीर्घकाळापासून तुरुंगात ठेवण्याच्या मुद्द्यापेक्षा अधिक महत्त्वपूर्ण आहेत, असे मत सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. तसेच सुनावणीस उशीर झाल्याचा मुद्दा अधोरेखित करून जामीन मागता येणार नाही. तसेच एखाद्या खटल्यात प्रत्येक आरोपीच्या भूमिकेचे वेगवेगळे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. सर्व आरोपींना एकच निकष लावणे न्यायसंगत ठरणार नाही. एखाद्या खटल्यात काही आरोपींची केंद्रीय भूमिका असते. तर काहींची भूमिका केवळ मदत करण्यापुरती असते. या दोघांमध्ये फरक केल्याशिवाय निर्णय देणे हे मनमानी केल्यासारखे होईल. प्रस्तुत खटल्यामध्ये उमर खालिद आणि शरजिल इमाम यांची भूमिका इतर आरोपींपेक्षा वेगळी आणि अधिक गंभीर असल्याचे दिसत आहे, असे निरीक्षणही सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.

---------

## अंधश्रध्देवर आधारीत भीतीवर

तक्रार केली होती. त्यानंतर प्रशासनाने या मूर्ती हटवल्या होत्या. ए. कार्तिक यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती डी. भरत चक्रवर्ती यांच्या एकलपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्याच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, मूर्तींची पुन्हा स्थापना झाली तर स्थानिक रहिवासी हिंसाचार आणि मालमत्तेची नासधूस करण्याची धमकी देत आहेत, त्यामुळे पोलिस संरक्षणाची आवश्यकता आहे. तर राज्य सरकारचा युक्तिवाद असा होता की, याचिकाकर्त्याला केवळ निवासी घर बांधण्याची परवानगी होती. त्याने परवानगीशिवाय त्याचे मंदिरात रूपांतर केले आहे. येथे मध्यरात्रीसह विचित्र वेळी पूजा केल्या जात होत्या, ज्यामुळे परिसरातील लोकांना त्रास होत होता. जर एखाद्या व्यक्तीला स्वत:च्या जागेत मूर्ती ठेवून स्वत: किंवा इच्छुक मित्र–नातलगांसोबत शांततेत पूजा करायची असेल, तर बहुसंख्यांच्या जोरावर जनता कायदा हातात घेऊ शकत नाही. प्रशासन अशा अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुतींना थारा देऊ शकत नाही. देव किंवा मूर्ती मानवाला कधीही हानी पोहोचवत नाही. अशा समजुती केवळ अंधश्रद्धा आहेत आणि त्या भक्ती किंवा विज्ञान यांपैकी कशातही बसत नाहीत असे निरीक्षण नोंदवत याचिकाकर्त्याला तत्काळ मूर्ती परत कराव्यात, असा आदेश न्यायमूर्ती डी. भरत चक्रवर्ती यांनी दिला. तसेच याचिकाकर्त्याने पूजेमध्ये लाऊडस्पीकर, ध्वनी प्रदूषण, शेजाऱ्यांना त्रास किंवा जनतेकडून पैसे गोळा करणे आदी कृत्य करू नयेत. तसेच याचिकाकर्त्याच्या जागेवर कोणतेही अनधिकृत बांधकाम असेल, तर त्यावर कायद्यानुसार स्वतंत्रपणे कारवाई केली जाऊ शकते असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

---------------

## बिनविरोध निवडून आलेले

उपस्थित केले आहेत. महाराष्ट्राला नवीन वर्षात 'राजकीय भ्रष्टाचाराचे गिफ्ट' मिळाले आहे. नगरसेवकांची खरेदी–विक्री करून लोकशाहीचा गळा आवळला जात आहे. लोकप्रतिनिधी कायद्यात 'बिनविरोध' निवडीची स्पष्ट संकल्पना नाही. त्यामुळे अशा उमेदवारांसाठी किमान मतदानाची टक्केवारी निश्चित करण्याची गरज आहे. राज्य निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली काम करत असून त्यांची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोप सरोदे यांनी केला आहे. याचिकेतील प्रमुख मागण्या... १. निकालावर स्थगिती : जोपर्यंत चौकशी पूर्ण होत नाही, तोपर्यंत या ७० जागांचे निकाल जाहीर करू नयेत. २. उच्च न्यायालयाची देखरेख : निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह असल्याने ही संपूर्ण चौकशी उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली व्हावी. ३. व्हिडिओ पुरावे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंगल्यावर जातानाचे उमेदवारांचे व्हायरल व्हिडिओ आणि इतर पुरावे न्यायालयात सादर केले जाणार आहेत. दरम्यान, येत्या १६ तारखेला, म्हणजेच निकालाच्या आधी या याचिकेवर सुनावणी होण्याची शक्यता आहे. यामुळे आता न्यायालय यावर काय निकाल देते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

------------

# शिवसेना उमेदवार अपघातात जखमी

जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ३ (क) मधील शिवसेनेचे उमेदवार हरेश देवावाले यांचा प्रचारादरम्यान अपघात झाला. या अपघातात ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जालना शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार हरेश देवावाले यांची प्रकृती स्थिर असून काळजी करण्याचे कारण नाही. डॉक्टरांचे प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे. या घटनेची माहिती मिळताच शिवसेनेचे नेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी तात्काळ रुग्णालयात भेट देऊन हरेश देवावाले यांची विचारपूस केली. यावेळी आमदार खोतकर यांनी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना योग्य व तातडीचे उपचार करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. ०६ जानेवारी २०२६


## थोडक्यात

### संत वामनभाऊ पुण्यतिथीनिमित्त त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

येथील श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठानच्या वतीने सन २०२६, वर्ष १३ वे निमित्ताने श्री संत वामनभाऊ महाराज व भगवान बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्रिदिनी कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा बुधवार, दि. ७ जानेवारी ते शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. संतोष महाराज उरणकर (विठ्ठल रुक्मिणी संस्था, पाटोदा) यांच्या कीर्तनसेवेने होणार आहे. गुरुवार, दि. ८ जानेवारी रोजी ह.भ.प. रामहरी महाराज वायबसे (श्री क्षेत्र भगवान गड) यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. ९ जानेवारी रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री (उत्तरीयाधिकारी, श्री क्षेत्र भगवान गड) यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या त्रिदिनी महोत्सवात गीतेवाडी, चुंबळी, येवलवाडी तसेच परिसरातील विविध भजनी मंडळांचा सहभाग राहणार आहे. कार्यक्रमासाठी समस्त ग्रामस्थ मंडळी पाटोदा तालुका यांच्या वतीने आयोजन करण्यात आले असून भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. स्थळ : श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठान, पाटोदा गितेवाडी फाटा पालखी मार्ग मार्ग, ता. पाटोदा, जि. बीड.

### मनूर वसाहत येथे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मनुर वसाहत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. सदरील क्रार्यक्रमाची सुरवात क्रांती ज्योती सावित्रीबाई फुलेच्या प्रतिमेचे पुजन सावित्रीबाई फुले वेशभुषेतील विद्यार्थीनीने केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणे, नृत्य, गीत गायन सादर केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक बी.एन. गायकवाड सर व विकास ढगे यांनी केले, क्रार्यक्रम यशस्वीते साठी सुकेशनी कोरडे मॅडम, रंजना कोरडे मॅडम, साक्षी मोरे मॅडम व आकाश भालेकर आभार प्रदर्शन गोतम पौळ सर यानी केले, क्रार्यक्रमासाठी शालेय समितीचे अध्यक्ष, माता पालक, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दर्पण दिनानिमित्त शिंगारवाडीतील बालनंदनवन इंग्लिश स्कूलमध्ये विशेष कार्यक्रम

तिंतरवणी । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद शिरूर कासार व बालनंदनवन इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आज मंगळवार ता.६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम पत्रकारितेतील मूल्ये, समाजप्रबोधन आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरणार असून पत्रकार, विद्यार्थी व नागरिकांसाठी मार्गदर्शक ठरेल. हा कार्यक्रम बालनंदनवन इंग्लिश स्कूल, शिंगारवाडी (तिंतरवणी) येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. तरी सर्व पत्रकार बांधवांनी, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी पत्रकार परिषद जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस, तालुका अध्यक्ष जालिंदर नन्नवरे, ज्येष्ठ पत्रकार बबनराव देशमुख, विजयकुमार गाडेकर, शंकर भालेकर, गोरख खेडकर, नवनाथ सानप, ज्ञानदेव शिंगटे, प्रतीक भांडेकर, बाळकृष्ण मंगरूळकर, शाहाबाज पठाण, विकास पाटील गाडेकर, जीवन कदम,गोकुळ सानप, अशोक कानगावकर, प्रकाश टकले, गोकुळ भुसारे तसेच मराठी पत्रकार परिषद शिरूर कासार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ऊसतोड कामगारांच्या आर्थिक संरक्षण व अपघातातील आर्थिक संरक्षणाची योजना तातडीने कार्यान्वित करा - धनंजय मुंडेंची मागणी

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

वर्षातील सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ विस्थापित होऊन विविध अपघातांसह सर्पदंश सारखी अनेक जीवघेणी संकटे अंगावर घेत ऊस तोडणी चे जोखमीचे काम करून इतरांची साखर गोड करणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या कल्याणासह त्यांचे आर्थिक संरक्षण व अपघातांमध्ये त्यांना विम्याचे संरक्षण मिळावे याबाबत मी सामाजिक न्याय विभागाचा मंत्री असताना काही योजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या, त्या योजना तातडीने कार्यान्वित करून त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी व ऊसतोड कामगारांना आर्थिक व विम्याचे संरक्षण मिळवून द्यावे अशी मागणी माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी राज्य शासनाकडे केली आहे.

बीड जिल्ह्याच्या वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी येथील रहिवासी असलेल्या ऊसतोड कामगार गणेश डोंगरे यांचा परवा धाराशिव जिल्ह्यातील एका साखर कारखान्याच्या प्रांगणात उसाचे भरलेले वाहन रिकामी करण्याच्या प्रतीक्षेत असताना ट्रॅक्टरचे उसाने भरलेले ट्रेलर अंगावर पडून झालेल्या अपघातात दुर्दैवी निधन झाले होते. विशेष म्हणजे गणेश डोंगरे व त्याची पत्नी हे ऊस तोडणी करत असतानाच्या व्यथा अत्यंत हसत खेळत सोशल मीडियावर रीलच्या माध्यमातून मांडत असल्याने गणेश व त्याची पत्नी हे लोकप्रिय होते. गणेशच्या पत्नीचा अपघात स्थळी फेसबुक लाईव्ह सुरू असतानाच हा अपघात घडला, त्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत असताना धनंजय मुंडे यांनी देखील या अपघाताबाबत एक्सपोस्ट करून दुःख व्यक्त केले आहे. गणेश डोंगरे यांचा मृत्यू म्हणजे गोड उसाची आणखी एक कडू आणि दुःखद कहानी असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्टमध्ये



म्हटले असून हा मृत्यू अत्यंत दुःखद व वेदनादायी असल्याचे म्हटले आहे. गरीब मात्र स्वाभिमानाने ऊस तोडणी करून आपल्या कुटुंबाचे निर्वाहन करणाऱ्या या बांधवाचे अकाली निधन झाल्यामुळे त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून या कठीण परिस्थितीत त्याच्या कुटुंबाला आम्ही एकटे पडू देणार नाही असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. राज्य शासनाने मयत गणेश डोंगरे यांच्या कुटुंबाला आर्थिक मदतीसह लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून आर्थिक संरक्षण व त्याच्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्याची लेखी स्वरुपात मागणी राज्य सरकारकडे करणार असून लवकरच डोंगरे कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी कळविले आहे.

महामंडळाचे काम करण्यास सामाजिक न्याय विभाग उदासीन?

दरम्यान लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची धनंजय मुंडे यांच्या मंत्री कार्यकाळात स्थापना, विविध योजनांचे प्रास्ताविक धनंजय मुंडे यांनी अत्यंत प्रगल्भतेने व वेगाने केले होते. मात्र मुंडे सामाजिक न्याय मंत्रीपदावरून पायउतार झाल्यानंतर महामंडळाचे काम पुन्हा एकदा मंदावले.

महामंडळाच्या कार्यालयाच्या कामकाजात, ऊसतोड कामगारांच्या नोंदणी अभियानात तसेच निधी संकलनात देखील महामंडळाचे काम प्रचंड मागे पडले असून, मागील दोन वर्षांत एकही ठोस योजना कार्यान्वित नाही; त्यामुळे या महामंडळाचे काम सुरळीतपणे चालवण्यास सामाजिक न्याय विभागाची उदासीनता दिसत असून हे कामकाज उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाकडे वर्ग करावे अशी मागणी धनंजय मुंडे यांनी याआधी देखील राज्य शासनाकडे पत्राद्वारे केलेली आहे. दरम्यान या घटनेनंतर राज्य सरकार धनंजय मुंडे यांच्या मागणीची दखल घेणार का? आणखी किती ऊसतोड कामगारांना नाहक आपले जीव गमवावे लागणार? असे अनेक प्रश्न आता अनुत्तरीत आहेत.

## सार्वजनिक रस्ता अडविल्या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतली हातावर फाईल

माजलगाव । प्रतिनिधी

**तालुक्यातील भाटवडगाव ग्रामपंचायत अंतर्गत गट न.१३८ मधील सार्वजनिक रस्ता अडविल्याचे प्रकरणांची फाईल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी हातावर घेतली असुन चौकशी चालू असताना ग्रामसेवक साहेबराव चव्हाण यांनी त्या जागेची ना हारकत देवुन रमेश पवार यांना खरेदी खत केले असल्याचे तक्रारदार सुरेश साळवे,रमेश साळवे सह ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ते खरेदी खत रद्द करुन रस्ता पुर्ववत सुरू करून देण्यात यावे अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांनी या प्रकरणी स्वतः लक्ष घालण्याचे आश्वासन देवून फाईल हातावर घेतली आहे.**

तालुक्यातील भाटवडगाव ग्रामपंचायत अंतर्गत गट नंबर १३८ मधील चंद्रशेखर साखरे व उत्तम राठोड यांच्या मधुन पुर्व पश्चिम राठोड टॉकीज ते भाटवडगाव हा पुर्ववत सार्वजनिक रस्ता आहे असे मुळ मालक चोरमले.यांनी



**चौकशी चालू असताना पुन्हा त्याच रस्त्याचे झालेले खरेदीखत रद्द करा तक्रारदारांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले निवेदन**

सांगून प्लॉट विक्री केले आहेत परंतु या रस्त्यावर तत्कालीन ग्रामसेवकाने व मालकाने प्लॉट दाखवून रस्ताच विक्री केला व सध्या कार्यरत असलेले ग्रामसेवक साहेबराव चव्हाण यांनी आपल्या पुतण्या कमलेश चव्हाण यांच्या नावे घेवून तो सार्वजनिक रस्त्यावर पत्र्याचे शेड उभारून गेलीं सात ते आठ महिन्या पासून बंद केला आहे,या प्रकरणी तक्रारदार सुरेश साळवे,रमेश साळवे यांनी पं स कार्यालया समोर उपोषण केले तर ३० ते ३५ ग्रामस्थांनी ग्रामपंचायत व गटविकास अधिकारी यांना निवेदन देवून रस्ता सुरु करून देण्याची मागणी केली वेळी वेळी वरिष्ठांकडे तक्रर केल्याने या प्रकरणी चौकशी समिती गठीत करुन चौकशी करण्यात आली परंतु चौकशी चालू असतांनाच ग्रामसेवक साहेबराव चव्हाण यांनी या जागेची ना हारकत देवुन रमेश पवार यांना तो प्लॉट दि ०२ मे २०२५ रोजी विक्री करून नमुना नंबर आठ ला त्यांची नोंद ही घेतली आहे असा अधिकाराचा गैरवापर करणाऱ्या ग्रामसेवक साहेबराव चव्हाण वर कायदेशीर कारवाई करून झालेले खरेदी खत रद्द करावे अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांना पत्यक्ष भेटुन निवेदनासह सर्व पुरावे सादर केले या निवेदनावर सुरेश साळवे,रमेश साळवे,बाबुराव जाधव,प्रशांत जगनाडे,प्रकाश राठोड,संजय राठोड,तानाजी सिरसट,आडे जी एम,सुरेश राऊत, राजेश राठोड यांच्या सह्या आहेत. दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांनी या प्रकरणी स्वतः लक्ष देण्याचे आश्वासन देवुन फाईल हातावर घेतली आहे.

पान ६ वरुन...

### पै.सतीश शिंदे यांच्या

दरेकर, हनुमंत झगडे, बंडू पवार, अमोल थेटे, विठ्ठल चखाले, शाम माने, प्रवीण श्रीखंडे, शितू मुटकुळे, अनिल तावरे, गहीनाथ गाडे, चंदू सपकाळ, पंडित पोकळे, संतोष गोयकर, आबासाहेब तांबे, अशोक आवारे, शरद वाळेकर, सदाभाऊ बन, माहादेव घुले, बाबू शिंदे, निखिल नरोडे, कुमार धनवडे, अंगदबीचे विकी हंबर्डे यांच्यासह सर्व नेते मंडळी सहकार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होते..

रक्तदान श्रेष्ठ दान - पै.सतीश शिंदे

वाढदिवसानिमित्त दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित केला जातो यामधून अनेक गरजूवंतांना योग्य वेळी रक्त मिळाल्याने त्यांचा जीवही वाचला आहे. रक्तदान हे अत्यंत महत्त्वाचे असून हे सर्वश्रेष्ठ दान असल्याने दरवर्षी हा उपक्रम घेतात त्याबद्दल सर्व माझ्या मित्र परिवाराचे खूप खूप आभार भविष्यातही या ठिकाणी गरज भासेल त्या ठिकाणी रक्त भेटेल यासाठी सर्व टीम प्रयत्नशील असेल...

पै.सतीश आबा शिंदे जिल्हा परिषद सदस्य तथा युवक जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड.कोठलाही राजकीय वारसा नसताना युवकांचा विश्वास संपादन करणारा नेतृत्वगुणी युवक सतिश आबा शिंदे

कोठलाही राजकीय वारसा, घराणेशाही किंवा मोठ्या पाठबळाविना केवळ स्वतःच्या कर्तृत्वावर, प्रामाणिकपणावर आणि सातत्यपूर्ण सामाजिक कार्याच्या जोरावर युवकांच्या गळ्यातील ताईत बनलेला युवक म्हणजे सतिश आबा शिंदे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा व प्रेरणादायी प्रवासाचा घेतलेला हा आढावा. ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातून आलेल्या सतिश आबा शिंदे यांनी लहानपणापासूनच समाजातील प्रश्नांची जाणीव ठेवली. युवकांच्या शिक्षण, रोजगार, व्यसनमुक्ती, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठी त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेतला. कोणतीही अपेक्षा न ठेवता केलेले हे कार्य युवकांच्या मनात त्यांच्याविषयी आपुलकी आणि विश्वास निर्माण करणारे ठरले. आजच्या युवकांना केवळ भाषणांपेक्षा कृतीची गरज असतेहे ओळखून सतिश आबांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून काम केले. संकटात सापडलेल्या युवकांसाठी धावून जाणे, प्रशासनाशी समन्वय साधून प्रश्न मार्गी लावणे, तसेच सामाजिक उपक्रमांत युवकांना नेतृत्वाची संधी देणेया त्यांच्या कार्यशैलीमुळे ते युवकांचे मार्गदर्शक बनले. राजकारणाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी ही सेवा आणि मूल्यांवर आधारित आहे. मतभेद असले तरी संवादातून मार्ग काढण्यावर त्यांचा भर असतो. म्हणूनच विविध विचारधारांचे युवक त्यांच्याशी जोडले गेले आहेत. ''आपल्यातीलच एक'' अशी भावना युवकांमध्ये निर्माण होणे, हीच त्यांच्या यशाची खरी पावती आहे. वाढदिवसानिमित्त सतिश आबा शिंदे यांना मनःपूर्वक शुभेच्छा! युवकांसाठी प्रेरणादायी ठरणारा त्यांचा प्रवास होवो.

### वसुलीसाठी मल्टिस्टेट

फडणीस यांनी दिले. सोमवारी (दि. ५) दुपारी १२ वाजता जिल्हा मध्यवर्ती बँकेत आयोजित आढावा बैठकीत त्यांनी अवसायक व प्रशासकांना स्पष्ट शब्दांत सुनावले

दिवाळखोरीत निघालेल्या ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी जिजाऊसह सर्व मल्टिस्टेट संस्थांच्या अवसायक व प्रशासकांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला. बैठकीस एमपीआयडीचे उपजिल्हाधिकारी सतीश सोनी, जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावार, समृत जाधव, ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिनभैय्या उबाळे, महेश डोंगरे, बाबू ढवाण, कैलास वीर तसेच सर्व अवसायक उपस्थित होते.आतापर्यंतच्या सर्व प्रकरणांचा आढावा घेताना विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी सर्व मल्टिस्टेट संस्थांचे तातडीने ऑडिट करण्याचे आदेश दिले. एमपीआयडीचे प्रलंबित प्रस्ताव वरिष्ठांकडे मंजुरीसाठी तात्काळ पाठवा, कर्जवसुली सक्तीची करा आणि सहकार्य न करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याबाबत कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

### भजन कर मस्त जवानी में,

या कथेमध्ये संबोधित करताना भागवताचार्य साठे महाराज म्हणाले माणूस हा संसाराच्या पाठीमागे लागला आहे. यामुळे सहाजिकच हरिभक्ती आणि हरी भजन करणे त्याला दुरापास्त होत आहे. तर काही लोक तारुण्यात संसार करायचा आणि म्हातारपणी भजन करायचं असा कयास बांधून आपले जीवन जगत आहे. तारुण्यामध्ये भजनाकडे पाठ करत आहे. अनेकांना वाटतं की आपण म्हातारे होत आणि मग नंतर आपण भजन करू परंतु म्हातारपण कोणी पाहिले आहे. कोणाची काय अवस्था होईल माहित नाही. म्हातारपणी माणसाची गात्र काम करत नाहीत मग त्याला भजनाचा कसा आनंद मिळेल. भजन जर करायचे असेल तर तारुण्यातच भजन केले पाहिजे म्हातार पण कोणी पाहिले आहे. तर काहींच्या नशिबी म्हातारपण ही नसते यामुळे तारुण्याच्या मस्तीमध्येच माणसाने भजन करावे आणि त्या हरीला आपलेसे करून घ्यावे म्हणजे जीवनाचे सार्थक होईल असे प्रतिपादन करणारा दिव्य संदेश भजन कर मस्त जवानी मे, बुढापा किसने देखा है.. हे भक्ती गीत गाऊन उपस्थित भाविक भक्तांना प्रभावित केले आहे. यावेळी हजारोच्या संख्येने भाविक भक्तांचा जनसमुदाय या ज्ञानयज्ञ मंडपामध्ये कथा श्रवण करत होता.

### करता पुरुष गमावलेल्या डोंगरे

असे भावनिक शब्द माजी आमदार केशवराव आंधळे यांनी यावेळी व्यक्त केले. त्यांच्या या ठाम भूमिकेमुळे डोंगरे कुटुंबाला केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर मानसिक आधार आणि सुरक्षिततेची भावना मिळाली आहे. कुटुंबाचा कणा मोडलेला असताना, आंधळे कुटुंबीयांचा मिळालेला हा पितृतुल्य आधार डोंगरे कुटुंबासाठी नवसंजीवनी ठरला आहे. डोळ्यांत अश्रू आणि मनात कृतज्ञता व्यक्त करत कुटुंबीयांनी माजी आमदार केशवराव आंधळे यांचे गावकऱ्यांनी ऋण व्यक्त केले आहे. या माणुसकीच्या कार्यामुळे संपूर्ण परिसरात माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या संवेदनशीलतेचे, सामाजिक बांधिलकीचे आणि माणुसकीच्या भूमिकेचे सर्वत्र स्वागत केले जात आहे. अपघाताने उद्ध्वस्त झालेल्या एका कुटुंबाला आधार देत त्यांनी राजकारणापलीकडे माणुसकी अजून जिवंत आहे, याचा प्रत्यय समाजाला दिला आहे. अशा कृतीमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असून गरजूंसाठी प्रेरणादायी उदाहरण उभे राहिले आहे. डोंगरे कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन करत मोठा आधार दिला आहे यावेळी माजी सभापती दिनकरराव आंधळे, उपनगराध्यक्ष बनसीधर मुंडे,उपसभापती अनिल चोले, माजी नगरसेवक सतिष बडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## जि.प. शिक्षिका शोभा दळवी यांना जिल्हा शिक्षक पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार गेवराई तालुक्यातील कर्तव्यनिष्ठ शिक्षिका श्रीम. शोभा सुरेश दळवी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रसुलाबाद यांना जाहीर करण्यात आला.

बीड येथे ०१ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झालेल्या भव्य समारंभात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते हा सन्मान मॅडमला प्रदान करण्यात आला. श्रीम. दळवी या सध्या जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, उमापुर येथे कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने व प्रामाणिकपणे विविध उपक्रम श्रीमती शोभा दळवी यांनी राबवले आहेत. आयडॉल शिक्षिका म्हणून देखील मॅडमची यावर्षी निवड झाली आहे. साहित्य निर्मिती, तंत्रस्नेही शिक्षण, नवोपक्रम, आनंददायी शिक्षण,



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सन्मान

प्रयोग, इंग्लिश उपक्रम, स्पर्धा परीक्षा, लोकसहभाग इत्यादी अनेक उल्लेखनीय त्यांचे कार्य आहे. आजपर्यंत चकलांबा केंद्रातील प्रा. शा. कासारवाडी व प्रा. शा. रसुलाबाद येथील कार्य उत्कृष्ट आहे. सदर पुरस्कार प्राप्त झाल्याने श्रीमती दळवी यांचे गटशिक्षण अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, सरपंच, व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य, यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. जिल्हा शिक्षक पुरस्कार राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना. अजितदादा पवार, खा. बजरंग सोनवणे, आ. सुरेश धस, आ.प्रकाश सोळंके, आ.विजयसिंह पंडित, आ. संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितेन रहेमान, शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर, शिक्षणाधिकारी (मा.)प्रियाराणी पाटील यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थितीत होते.

## वडवणी पोलीस ठाण्यात पोलीस वर्धापन दिन साजरा

### ओळख आपल्या पोलीस ठाण्याची- स.पो.नि.वर्षा व्हगाडे

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी शहरातील पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ओळख आपल्या पोलीस ठाण्याची हा उपक्रम शुक्रवार दि.०२ जानेवारी २०२६ रोजी वडवणी पोलीस ठाण्यात आयोजित करून महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

०२ जानेवारी १९६१ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलाची स्थापना करण्यात आली म्हणून ०२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र राज्यत महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात येतो याच अनुषंगाने वडवणी पोलीस ठाण्याच्या कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे



यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस ठाण्यात ओळख आपल्या पोलीस ठाण्याची हा उपक्रम राबवून त्या अंतर्गत वडवणी येथील शाळेतील मुलींना वडवणी पोलीस ठाण्यात बोलून त्यांना गोपनीय शाखा,सीसीटीएचएस शाखा,मुद्देमाल कक्ष,ठाणे अंमलदार त्यांची कामे,महत्त्व पोलिसांचे रँक,शस्त्र त्यांचे महत्त्व त्यांचा उपयोग ही सर्व माहिती मुलींना सांगितली व ते सर्व साहित्य मुलींनी स्वतः हाताळले व त्यातून विद्यार्थी व पोलीस यांच्यामध्ये नवीन ओळख झाली. मुलींनी वडवणी पोलीस ठाण्याच्या पहिल्या महिला पोलीस अधिकारी स.पो.नि.वर्षा व्हगाडे मॅडम यांचे हा उपक्रम राबवल्याबद्दल आभार मानून त्यांना व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## बालझुंबडने अंबाजोगाईचा नांवलौकिक वाढविला -नगरसेवक ताहेर सय्यद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**बालझुंबडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध झाले असून कला, साहित्य, सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात बालझुंबडने अंबाजोगाईचा नांवलौकिक वाढविला असे मत नगरसेवक ताहेर सय्यद यांनी व्यक्त केले. ते प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने रविवारी २६ व्या बालझुंबडच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.**

उद्घाटक म्हणून मुकबधीर विद्यार्थी व बालझुंबडच्या विविध स्पर्धेतील माजी विजेते अभिषेक कोंडिराम चव्हाण आणि कु.नंदिनी संतोष अग्रवाल हे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खोलेश्वर सीबीएसई जिनियसच्या मुख्याध्यापिका प्रतिभा शिंदे,प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार दिलीप आरसुळ,नगरसेवक ताहेर सय्यद, सि.व्ही.गायकवाड,परिक्षक कला शिक्षक नामदेव मोरे,विठ्ठल मंदे आदी उपस्थित होते.

यावेळी परिक्षक विठ्ठल मंदे यांनी बालझुंबडच्या स्पर्धा नियोजनबद्ध पद्धतीने होतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना व्यक्त होण्याची संधी उपलब्ध होते असे त्यांनी




### बालझुंबड २०२६ चे उद्घाटन

सांगितले. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापिका प्रतिभा शिंदे म्हणाल्या की, जीवनात योग्य रंग संगती असल्यासच जीवन यशस्वी होते. विद्यार्थ्यांना योग्य प्रसंगी योग्य मार्गदर्शन मिळणे त्यासोबतच बालझुंबड सारख्या संधी मिळणे ही आवश्यक बाब आहे. स्पर्धेच्या आयोजनाबद्दल संयोजक राजकिशोर मोदी,सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी,कार्यकारी संचालक संकेत मोदी यांचे कौतुक केले. व विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत मोठ्या संख्येने स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापक विनायक मुंजे यांनी बालझुंबडचे हे २६ वे वर्ष असून प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने संयोजक राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी, कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू असल्याचे सांगितले. राजेश कांबळे यांनी संचालन करून आभार मानले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी राजेश कांबळे, मुख्याध्यापक विनायक मुंजे,आनंद टाकळकर, शिल्पा पौळ, मेघाअकोलकर, सोमवंशी आदीसह प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाचे पदाधिकारी विजय रापतवार, सचिन जाधव, विशाल जगताप यांनी परिश्रम घेतले.

चित्रकला स्पर्धेत उस्फुर्त प्रतिसाद

बालझुंबड स्पर्धेत १ ली ते २ री व ३ री ते ४ थी या गटासाठी रंगभरण तर ५ ते ७ व ८ वी ते १० वी या गटासाठी चित्रकला स्पर्धेत अंबाजोगाई शहर व तालुक्यातील दीड हजार विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी गटातील विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयांवरील चित्रांचे आकर्षक रेखाटन केले.

# कलेक्टर जमीन विकत घेताना घ्या काळजी

पुणे : कलेक्टर लँड म्हणजे अशी जमीन जी शासनाने/कलेक्टरने काही अटींवर कुणाला दिलेली असते. ही जमीन सामान्यतः पुनर्वसन, भूकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, दलित/वंचित, सैनिक, स्वातंत्र्यसैनिक अशा विशिष्ट लोकांना सवलतीच्या दराने किंवा मोफत दिलेली असते. या जमिनीवर - (अहस्तांतरणीय) अशा अटी असतात. म्हणजे ठराविक काळापर्यंत ती विकता येत नाही. कलेक्टर परवानगीशिवाय अशी जमीन विकणे-बांधकाम करणे बेकायदेशीर ठरते.

शासकीय अनुदानित जमीन किंवा क्लास सेकंड अशी नोंद असते. म्हणजे सामान्य जमीन जी मुक्तपणे विकता येते, पण वर्ग २ ही कलेक्टरच्या अटींसह असते. अटी तपासा जमिनीवर बिनअटी रूपांतरण झाले आहे का हे खात्री करा. अजूनही जिल्हाधिकारी परवानगी लागते का हे तलाठी, तहसीलदार कार्यालयांच्या नोंदीतून पाहता येईल. वर्ग २ जमीन विकत



घ्यायची असल्यास, विक्रेत्याने जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करून परवानगी घेतलेली असणे आवश्यक आहे. ही परवानगी दस्तऐवजात नमूद असावी. फसवणूक टाळा. अनेकदा लोक सामान्य जमिनीप्रमाणे विकतात पण नंतर व्यवहार रद्द ठरतो. अशा जमिनीवर बँक कर्जही मिळत नाही. विक्रीनंतर खरी नोंद झाली आहे का ते पहा. जिल्हाधिकाऱ्याने दिलेली सवलत मोडली आहे का हे खात्री करा, कारण मोडल्यास जमीन सरकारकडे परत जाते. याची वैशिष्ट्ये : साधारणतः पुनर्वसन, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, सैनिक/स्वातंत्र्यसैनिक, मागासवर्गीय यांना दिलेली असते. अनुदानित किंमत किंवा मोफत दिली जाते. जमिनीवर अटींची जमीन अशी नोंद असते. विकत घेताना घ्यावयाची खबरदारी : विक्रीला जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आहे का? सातबारा उतारा - वर्ग २ की वर्ग १ आहे ते बघा. फेरफार नोंद झाल्यावर जमिनीची नोंद व्यवस्थित बदलली आहे का? जमिनीवर कोणते कर्ज / बंधन नाही ना? अनुभवी वकीलकडून कागदपत्रे तपासून घ्या. जर बँक कर्ज देत नसेल तर समजा जमीन अजूनही वर्ग २ मध्ये आहे.

# रांगडा कांद्याच्या लागवडीची उपयुक्त माहिती



महाराष्ट्रात अनेक भागात रांगडा कांद्याची लागवड होते कारण या हंगामात लागवड केलेल्या कांद्याची साठवणक्षमता खरिप हंगामापेक्षा उत्कृष्ट असते. रांगड्या कांद्याच्या लागवडीसाठी ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये रोपवाटिका तयार केली जाते आणि रब्बी हंगामात रोपांची पुनर्लागवड केली जाते. जाणून घेऊ या रांगडा कांद्याचे करावयाचे व्यवस्थापन.

रांगडा कांद्याचे व्यवस्थापन : एक एकर कांदा लागवडीसाठी दोन गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी. एक एकर लागवडीसाठी दोन ते तीन किलो बियाणे पुरेसे आहे. पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम कार्बेन्डाझिम हे बुरशीनाशक चोळावे. पेरणीपूर्वी २०० किलो शेणखतासोबत ५०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हिरीडी वापरून जमिनीत मिसळावे. रोपवाटिकेत ठिबक किंवा स्प्रिंकलर सिंचन पद्धतीचा वापर करण्यासाठी जमिनीपासून १० ते १५ सें.मी. उंच, १ ते १.२ मीटर रूंद आणि गरजेनुसार लांब गादीवाफे जमिनीच्या उताराला आडवे तयार करावेत. यामुळे रोपांची वाढ एकसारखी होते आणि पाणी फार काळ साचून राहत नाही, रोपे कुजत किंवा सडत नाहीत, लावणीच्या वेळी सहज उपटून काढता येतात, रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. वाफे तयार करताना दर १६०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम स्फुरद, ४०० ग्रॅम पोटॅश प्रति २०० चौरस मीटर याप्रमाणे खते द्यावीत. रुंदीशी समांतर ५-७.५ सें.मी. अंतरावर एक रेघा पाडून १-१.५ से.मी. खोलीवर बियाणे पेरावे. पेरणीनंतर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खताने बियाणे झाकून ठेवावे, नंतर झारीने जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पद्धतीने पाणी द्यावे. पेरणीनंतर २० दिवसांनी हाताने खुरपणी करून ८०० ग्रॅम प्रति २०० चौरस मीटर या प्रमाणात नत्र द्यावे.

# काळी मका ठरतेय शेतकऱ्यांच्या फायद्याची

भारतातील देशी मक्यावरील अनेक वर्षांच्या संशोधनानंतर छिंदवाडा येथील कृषी संशोधन केंद्रात काळ्या म्हणजेच रंगीत मक्याचे संशोधन करण्यात आले आहे. काळ्या मक्याची खास गोष्ट म्हणजे त्यात जस्त, तांबे आणि लोहाचे प्रमाण चांगले असते. जे कुपोषणाशी लढण्यासाठी प्रभावी ठरते. कृषी शास्त्रज्ञांनी मक्याची ही नवीन जात जवाहर मका १०१४ विकसित केली आहे.

मका लागवड ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. बेबी कॉर्न आणि स्वीट कॉर्नची मका लागवड देशभरात केली जाते. झैद हंगामातील पिकांच्या पेरणीत शेतकरी चांगल्या उत्पन्नासाठी काळ्या मक्याची लागवड करू शकतात. या पिकाचे वैशिष्ट्य म्हणजे ते तयार होण्यासाठी केवळ ९० ते ९५ दिवस लागतात आणि त्याचे उत्पादनही इतर पिकांच्या तुलनेत जास्त आहे. भारतात काळ्या मक्याच्या एका कणसाची किंमत सुमारे २०० रुपये आहे. काळ्या मक्याची खासियत : भारतातील देशी मक्यावरील अनेक वर्षांच्या संशोधनानंतर छिंदवाडा येथील कृषी संशोधन केंद्रात काळ्या म्हणजेच रंगीत मक्याचे संशोधन करण्यात आले आहे. काळ्या मक्याची खास गोष्ट म्हणजे त्यात जस्त, तांबे आणि लोहाचे प्रमाण चांगले असते. जे कुपोषणाशी लढण्यासाठी प्रभावी ठरते. कृषी शास्त्रज्ञांनी मक्याची ही नवीन जात जवाहर मका १०१४ विकसित केली आहे. काळे कॉर्न हेल्दी उत्पादनांमध्ये वापरले जाऊ शकते. ही मक्याची पहिली जात आहे. जी पौष्टिक आणि जैव-फोर्टिफाइड आहे. मक्याच्या दाण्यांचा रंग सामान्यतः पिवळा असतो. परंतु या नवीन प्रजातीचा रंग काळा, लाल आणि तपकिरी असतो.


काळ्या मक्याची लागवड : मक्याची ही नवीन जात पक्व होण्यासाठी ९५ ते ९७ दिवस लागतात. एकरी ८ किलो बियाणे लागवड करून शेतकरी २६ क्विंटलपर्यंत उत्पादन घेऊ शकतात. काळ्या मक्याचे तंतू वाढण्यास सुमारे ५० दिवस लागतात. काळ्या मक्याच्या लागवडीसाठी उष्ण हवामान योग्य मानले जाते. जेव्हा मका त्याच्या रोपामध्ये तयार होतो तेव्हा त्याला जास्त पाणी द्यावे लागते. मक्याच्या या जातीची लागवड ओळींमध्ये केली जाते. एका रोपापासून दुसऱ्या रोपापर्यंतचे अंतर सुमारे ६० ते ७५ सें.मी. काळी मका खोड रोगास सहनशील आहे. ही वाण पावसाच्या प्रदेशासाठी, विशेषतः पठारी भागात अतिशय योग्य आहे.काळ्या मक्यापासून मोठी कमाई : मंडईत पांढऱ्या आणि लाल मक्याचा सरासरी भाव २०५० ते २७०० रुपये प्रतिक्विंटल आहे. झैद हंगामात काळा मका पेरला जातो, तो तयार होण्यासाठी फक्त ९० ते ९५ दिवस लागतात. मक्याच्या या नवीन जातीमध्ये लोह, तांबे आणि जस्त मुबलक प्रमाणात आढळतात, जे कुपोषणाशी लढण्यास मदत करतात. काळ्या मक्याचा शेंगा बाजारात महागड्या किमतीत उपलब्ध आहे, ऑनलाइन वेबसाइट्सवर एका मक्याची किंमत २०० रुपये आहे. काळ्या मक्याचा भाव नेहमीच सामान्य मक्यापेक्षा जास्त असतो. भारतात फार कमी शेतकरी काळ्या मक्याची लागवड करतात.



# जमिनीच्या गुणधर्मानुसार वापरा रासायनिक खते

जमिनीच्या पोतानुसार आणि प्रकारानुसार रासायनिक खतांची निवड करणे उत्पादकता वाढविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. रासायनिक खतांसोबत शेणखत किंवा गांडूळ खताचा वापर केल्यास जमिनीचा पोत सुधारतो, जमिनीची सुपीकता टिकून राहते आणि रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढते. जमिनीचा सामू अन्नद्रव्यांच्या उपलब्धतेच्या दृष्टीने फार महत्त्वाचा असतो. जमिनीचा सामू ६.५ पेक्षा कमी असल्यास जमीन आम्लधर्मी आणि ७.५ पेक्षा जास्त असल्यास ती जमीन विम्लधर्मी किंवा अल्कधर्मी मानली जाते. अशा जमिनीत पिकांना अन्नद्रव्यांची उपलब्धता कमी होते, विशेषतः स्फुरद आणि लोह, जस्त यांसारखी सूक्ष्म अन्नद्रव्ये पिकांना सहजासहजी मिळत नाहीत. अशा अल्कधर्मी जमिनीसाठी जमिनीत आम्लधर्मी प्रकारची खते आणि भूसुधारक वापरणे फायदेशीर ठरते. ही खते जमिनीचा सामू कमी करण्यास मदत करतात आणि लोह, फॉस्फरस आणि झिंकसारख्या स्थिर अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढवतात. ज्या खतांमुळे जमिनीचा सामू कमी होण्यास मदत होते, अशी खते वापरावीत.

अमोनिअम सल्फेट : नत्र पुरविण्यासाठी हे उत्तम खत आहे कारण याचा स्वभाव आम्लयुक्त असतो. हे सर्वांत प्रभावी आम्लयुक्त परिणाम देणारे खत आहे. हे जमिनीत मिसळल्यावर हायड्रोजन आयन मुक्त करते, ज्यामुळे सामू कमी होतो. अमोनिअम नायट्रेट : हे आम्लयुक्त खत आहे. ठिबक सिंचनाद्वारे याचा वापर केल्यास ते जमिनीचा अल्कधर्मीपणा कमी करते. एक आम्लीय स्रोत जमिनीत मिसळल्यावर तत्काळ आणि दीर्घकालीन नायट्रोजन पुरवतो. सिंगल सुपर फॉस्फेट : मातीमध्ये फॉस्फरस अनेकदा स्थिर होतो, वनस्पतींसाठी



उपलब्ध राहत नाही. सिंगल सुपर फॉस्फेटमध्ये गंधकाचे प्रमाण असल्याने ते अल्कधर्मी जमिनीसाठी उत्तम आहे. मोनो-अमोनिअम फॉस्फेट : हे डीएपी पेक्षा जास्त आम्लयुक्त असते, त्यामुळे ७.५ पेक्षा जास्त सामू असलेल्या जमिनीत अधिक उपयुक्त ठरते. फॉस्फेरिक ॲसिड : ठिबक सिंचनाद्वारे याचा वापर केल्यास मातीतील क्षारीयता थेट कमी करता येते, कारण जमिनीचा अल्कधर्मीपणा थेट कमी करते आणि स्फुरद उपलब्ध करून देते. पोटॅशिअम सल्फेट : अल्कधर्मी जमिनीत म्युरेट ऑफ पोटॅशऐवजी पोटॅशिअम सल्फेट वापरणे चांगले असते, कारण त्यातील सल्फेट मुळांच्या कार्यक्षेत्रातील सामू कमी करण्यास मदत करते. गंधक : सामू ८.५ पेक्षा कमी असल्यास गंधकाचा वापर शेणखतात मिसळून करावा. गंधकामुळे जमिनीचा सामू हळूहळू कमी होतो. जिप्सम : जर जमिनीत चुनखडीचे प्रमाण कमी असेल आणि सामू जास्त असेल, तर जिप्समचा वापर जमिनीच्या सुधारणेसाठी केला जातो. पोषक तत्त्वांची उपलब्धता वाढणे : अल्कधर्मी जमिनीत स्फुरद आणि लोह हे घटक स्थिर होतात, म्हणजेच पिकांना मिळत नाहीत. आम्लयुक्त खतांच्या अभिक्रियेमुळे तयार होणाऱ्या स्थानिक आम्लतेमुळे जमिनीतील अघुलनशील पोषक तत्त्वे विरघळतात आणि पिकांना सहज उपलब्ध होतात.

आम्लयुक्त खते हायड्रोजन आयन सोडतात, जे जमिनीतील अल्कली (क्षार) उदासीन करतात आणि मातीचा सामू पिकांसाठी पोषक बनवतात. माती परीक्षणानुसार वापर : रासायनिक खतांचा वापर माती परीक्षणानुसार करावा. खते टाकण्यापूर्वी माती परीक्षण करून नेमक्या कोणत्या अन्नद्रव्याची कमतरता आहे हे तपासावे. सेंद्रिय खतांचा आधार : रासायनिक खतांसोबत शेणखत किंवा गांडूळ खताचा वापर केल्यास जमिनीचा पोत सुधारतो, जमिनीची सुपीकता टिकून राहते आणि रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढते. काळी जमीन : यामध्ये स्फुरद आणि पालाश मध्यम प्रमाणात असते, पण नत्राची कमतरता असते. यामध्ये चुनखडीचे प्रमाण जास्त असू शकते. अमोनिअम सल्फेट आणि नत्र-स्फुरद-पालाशयुक्त संयुक्त खते वापरावीत. सिंगल सुपर फॉस्फेट वापरणे अधिक फायदेशीर ठरते. लाल किंवा हलकी जमीन : अशा जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी असते आणि अन्नद्रव्ये लवकर वाहून जातात. यामध्ये नत्र, स्फुरद आणि सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी असते. नत्रयुक्त खतांच्या (युरिया) मात्रा विभागून द्याव्यात जेणेकरून नत्र वाहून जाणार नाही. स्फुरदासाठी सिंगल सुपर फॉस्फेटचा वापर करावा. या जमिनीत नत्र-स्फुरद-पालाशयुक्त संयुक्त खते वापरणे योग्य ठरते.

क्षारयुक्त किंवा अल्कधर्मी जमीन : या जमिनीचा सामू ७.५ पेक्षा जास्त असतो, जिथे लोह आणि जस्ताची कमतरता जाणवते. आम्लयुक्त खतांचा वापर करावा. अमोनिअम सल्फेट हे नत्राचा सर्वोत्तम स्रोत आहे. स्फुरदासाठी सिंगल सुपर फॉस्फेटला प्राधान्य द्यावे, कारण त्यात गंधक असते. गाळाची किंवा मध्यम जमीन : ही जमीन सुपीक असून सर्वसाधारणपणे सर्व पिकांसाठी योग्य असते. पिकाच्या गरजेनुसार संतुलित खतांचा वापर करावा. तृणधान्यांसाठी (गहू, भात) नत्रयुक्त, तर कडधान्यांसाठी स्फुरदयुक्त खतांची निवड करावी. लॅटराईट किंवा जांभा जमीन : ही जमीन कोकण भागात प्रामुख्याने आढळते. ही जमीन निसर्गतः आम्लधर्मी येथे विद्राव्य फॉस्फेट लवकर स्थिर होते, म्हणून रॉक फॉस्फेट किंवा बोनमिल सारख्या मंद गतीने विरघळणाऱ्या खतांचा वापर करावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजी महाराजांनी सूर्यग्रहणाच्या निमित्ताने राजमाता जिजाऊ व सोनोपंत विश्वनाथ डबीर यांची सुवर्णतुला केली. श्री क्षेत्र महाबळेश्वर येथील देवळासमोर ही सुवर्णतुला झाली.
१६७३ : कोंडाजी फर्जंद यांनी अवघ्या ६० मावळ्यांनिशी पन्हाळा जिंकून महाराजांचे १३ वर्षे अपुर्ण असलेले स्वप्न पूर्ण केले.
१८३२ : पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी इंग्रजी व मराठीतील पहिले साप्ताहिक वृत्तपत्र 'दर्पण' सुरू केले.
१८३८ : सॅम्युअल मॉर्स यांनी तारयंत्राचा शोध लावला.
१९०७ : मारिया माँटेसरी यांनी पहिली माँटेसरी शाळा सुरूकेली. त्यांच्या शाळांमुळे पूर्वप्राथमिक शिक्षणात आमूलाग्र बदल झाला.
१९१२ : न्यू मेक्सिको हे अमेरिकेचे ४७ वे राज्य बनले.
१९२४ : राजकारणात भाग न घेणे व रत्नागिरी जिल्ह्यातच राहणे या अटींवर स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जन्मठेपेतुन सशर्त मुक्तता
१९२९ : गोरगरिब व रुग्णांची सेवा करण्यासाठी मदर तेरेसा यांचे कोलकाता येथे आगमन
१९४४ : दुसरे महायुद्ध - रशियन सैन्य पोलंडमध्ये शिरले.
१९४६ : आजच्या दिवशी व्हिएतनाम येथे पहिल्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या.
१९८९ : केहर सिंह आणि सतवंत सिंह यांनाइंदिरा गांधींच्या हत्या करण्याच्या गुन्हात फाशीची शिक्षा देण्यात आली.
१९९४ : सिडनी टेस्ट सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या टीम ने ऑस्ट्रेलिया च्या टीम ला ५ रन नी हरविले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४१२ : फ्रान्सला परकीय जोखडातून मुक्त करणार्या 'जोन ऑफ आर्क'चा जन्म. तिला चेटकीण ठरवून जाळण्यात आले. नंतर मात्र तिला संत ठरवले गेले. ती 'द मेड ऑफ ऑर्लिन्स' या टोपणनावानेही ओळखली जाते. (मृत्यू: ३० मे १४३१)
१७४५ : बलूनच्या सहाय्याने आकाशात उडण्याचे प्रयोग करणाऱ्या जाक्कास एलियन माँटगोल्फिएर यांचा जन्म.
१८१२ : बाळशास्त्री जांभेकर - मराठी पत्रकारितेचे पितामह, १८३२ मधे 'दर्पण' हे वृत्तपत्र काढून त्यांनी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. 'दिग्दर्शन' हे मराठीतील पहिले मासिकही त्यांनीच १८४० मधे सुरू केले. (मृत्यू: १८ मे १८४६)
१८२२ : उत्खनन करून ट्रॉय आणि मायसेनी या नगरीचा शोध लावणाऱ्या हेन्रीचा श्लीमन यांचा जन्म.
१८६८ : गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ 'दासगणू महाराज' - आधुनिक संतकवी, 'भक्तिरसामृत', 'भक्तकथामृत' आणि 'संतकथामृत' हे त्यांचे संतचरित्रात्मक ग्रंथ आहेत. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९६२)
१८८३ : खलील जिब्रान - लेबनॉनमधे जन्मलेले अमेरिकन कवी, लेखक व कलाकार (मृत्यू: १० एप्रिल १९३१)
१९१० : ला प्रसिद्ध भारतीय गायक जी. एन. बालासुब्रमनियम यांचा जन्म.
१९१८ : ला भारतीय प्रसिद्ध गायक भारत व्यास यांचा जन्म.
१९२५ : रमेश मंत्री - प्रवासवर्णनकार, कथाकार, विनोदी लेखक (मृत्यू: १९ जून १९९८)
१९२८ : नाटककार, चित्रपटकथालेखक, पत्रकार व साहित्यिक विजय तेंडुलकर यांचा जन्म. (मृत्यू: १९ मे २००८ पुणे, महाराष्ट्र)
१९३१ : डॉ. आर. डी. देशपांडे - पर्यावरण क्षेत्रातील शा'स्त्रज्ञ, 'महाराष्ट्र असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स'चे (आघारकर रिसर्च इन्स्टिट्युट) अध्यक्ष
१९४० : प्रसिद्ध भारतीय लेखक नरेंद्र कोहली यांचा जन्म.
१९४९ : परमवीर चक्राने सन्मानित सुभेदार बाना सिंग यांचा जन्म.
१९५५ : रोवान ॲटकिन्सन - विनोदी अभिनेते व पटकथालेखक
१९५९ : कपिल देव निखंज - भारतीय क्रिकेट कप्तान, समालोचक व प्रशिक्षक
१९६५ : हिमाचल प्रदेश चे १४ वे मुख्यमंत्री जय राम ठाकूर यांचा जन्म.
१९६७ : ऑस्कर पुरस्कारविजेते जगप्रसिद्ध गायक ए. आर. रेहमान यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९६ : जिवबा दादा बक्षी - महादजी शिंदे यांचे सेनापती, मुत्सद्दी
१८४७ : त्यागराज - दाक्षिणात्य संगीतकार (जन्म: ४ मे १७६७)
१८५२ : लुई ब्रेल - अंधांना उपयोगी पडणाऱ्या ब्रेल लिपीचे जनक व शिक्षक (जन्म: ४ जानेवारी १८०९)
१८८४ : ग्रेगोर मेंडेल - जनुकांची संकल्पना मांडणारा जर्मन जीवशास्त्रज्ञ (जन्म: २० जुलै १८२२)
१८८५ : भारतेंदू हरिश्चंद्र - आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (जन्म: ९ सप्टेंबर १८५०)
१९१८ : जी. कँटर - जर्मन गणितज्ञ (जन्म: ३ मार्च १८४५)
१९१९ : थिओडोर रुझव्हेल्ट - अमेरिकेचे २६ वे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २७ आक्टोबर १८५८)
१९७१ : प्रफुल्लचंद्र तथा पी. सी. सरकार - जादूगार (जन्म: २३ फेब्रुवारी १९१३)
१९८१ : ए. जे. क्रोनिन - स्कॉटिश लेखक (जन्म: १९ जुलै १८९६)
१९८४ : 'विद्यानिधी' सिद्धेश्वरशास्त्री विष्णू चित्राव - महामहोपाध्याय, वैदिक साहित्याचे अभ्यासक व मराठी कोशकार (जन्म: १ फेब्रुवारी १८८४)
२००८ : भारतीय ऑर्थोपेडिक सर्जन प्रमोद करन सेठी यांचे निधन.
२००९ : जम्मू काश्मीर चे माजी मुख्यमंत्री गुलाम मोहम्मद शाह यांचे निधन.
२०१० : प्रल्हाद ईरबाजी सोनकांबळे - लेखक व इंग्रजीचे प्राध्यापक (जन्म: १६ जुलै १९४३).
२०१७ : भारतीय अभिनेता ओम पुरी यांचे निधन.

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत

# निवडणुकीत विजय मिळविण्याकरीता सर्वांना सोबत घेऊन चला-बावणकुळे

## भाजप,शिवसेना,राष्ट्रवादी युती का झाली नाही याचे दिले स्पष्टीकरण

जालना । प्रतिनिधी

जालना शहर महानगर पालिका निवडणूक -२०२६ मध्ये भारतीय जनता पार्टी ला स्पष्ट बहुमत मिळविण्याकरिता सर्व उमेदवारांनी आपल्या प्रभागातील सर्व घटकाना सोबत घेऊन तसेच राज्यातील फडणवीस सरकार यांनी केलेली कामे मतदारा पर्यंत पोहचून जासित जास्त मतदान भारतीय जनता पार्टीला कसे मिळेल त्याकरिता प्रयत्न करावे असे जालन्यात येऊन बावनकुळे साहेब सांगतात परंतु जालना शहरातील तुमच्यासोबत असल्याने सर्व कार्यकर्त्यांना अंधारात ठेवून विश्वासघात केला व उमेदवारी देण्यापासून वंचित ठेवले तसेच भाजप शिवसेना राष्ट्रवादी युती होणार आहे असे आश्वेशन



आपल्याच नेते मंडळीने दिल्या याचा अभ्यास करणे गरजेचे आहे यावरून असे दिसून येते की सगळ्याला सोबत घेऊन कसे निवडणूक होणार आहे याबाबत विचार मंथन करण्याचे गरजेचे आहे.जास्तीत जास्त उमेदवार भाजपाचे निवडून आणावे असे आज भारतीय जनता पार्टी मध्यवर्ती प्रचार कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात उमेदवारांना मार्गदर्शनात ते बोलत होते.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री श्री. रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री तथा आ. बबनराव लोणीकर,आ.श्री.संतोष पाटील दानवे,महानगर पालिका निवडणूक प्रमुख तथा माजी आमदार श्री. कैलास गोरंट्याल,महानगर जिल्हाध्यक्ष श्री.भास्कर आबा दानवे, माजी आमदार श्री.विलास खरात या मान्यवरांसह महानगरातील भाजपाचे सर्व उमेदवार उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणालेकी नुकत्याच झालेल्या नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीमध्ये सर्वात जास्त जागा मिळवून भाजपा हा क्रमांक एकचा चा पक्ष बनला आहे व होत असलेल्या महानगर पालिका निवडणुकीमध्ये सुद्धा क्रमांक एक होण्यासाठी निवडणुकीत उभे असलेल्या सर्व उमेदवारांनी जास्तीत जास्त प्रयत्न करून विजय मिळवावा व जालनां महानगर पालिका भाजपच्या ताब्यात आणावी असे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन झाले यावेळी उमेदवारासह,प्रमुख पदाधिकारी यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# जालना शहरातील नागरिकांनी पाण्यासाठी दोन दिवस सहन करा

जालना । प्रतिनिधी

नवीन जालना विभागाचा पाणीपुरवठा दोन दिवस विस्कळीत; पाईपलाईन दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले दुरुस्तीसाठी पाणीपुरवठा वाहिनी राहणार बंद यामुळे जालना शहरातील नागरिकांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होणार आहे. शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि पाण्याची नासाडी रोखण्यासाठी जालना शहर महानगरपालिकेने संत गाडगेबाबा जलाशय (घाणेवाडी) ते जलशुद्धीकरण केंद्र दरम्यानच्या मुख्य पाईपलाईनवरील गळती दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. या तांत्रिक कामामुळे सोमवार, दिनांक ५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी पाणीपुरवठा वाहिनी बंद ठेवली जाणार आहे.

घाणेवाडी जलाशयाकडून जलशुद्धीकरण केंद्राकडे येणाऱ्या मुख्य जलवाहिनीवर दोन ते तीन ठिकाणी मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही गळती दुरुस्त करणे अत्यावश्यक असल्याने प्रशासनाने तात्काळ दुरुस्तीचा निर्णय घेतला आहे. ५ जानेवारी रोजी सकाळी ही मुख्य लाईन बंद करून युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम पूर्ण केले जाणार आहे. मुख्य जलवाहिनी बंद राहणार असल्याने प्रामुख्याने नवीन जालना विभागातील पाणीपुरवठ्यावर याचा परिणाम होईल. दुरुस्तीच्या कामामुळे या भागातील पाणीपुरवठा नियोजित वेळेपेक्षा एक ते दोन दिवस उशिरा होण्याची शक्यता आहे. पाणीपुरवठा उशिरा होणार असल्याने नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा जपून वापर करावा आणि महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन शहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जालना शहर महानगरपालिका यांच्यामार्फत करण्यात आले आहे. दुरुस्तीचे काम पूर्ण होताच पाणीपुरवठा पुन्हा पूर्ववत करण्यात येईल, अशी माहिती विभागाकडून देण्यात आली आहे.

# संभाजीनगरमध्ये ऑफर्समुळे चेंगराचेंगरी

## ५००० ची साडी ५९९ रुपयांत खरेदीसाठी महिलांची झुंबड

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

सवलतींच्या ऑफर्समुळे रविवारी आकाशवाणी ते त्रिमूर्ती चौक परिसरात एका शोरूमबाहेर अशी गर्दी उसळली होती. सवलतींच्या ऑफर्समुळे रविवारी आकाशवाणी ते त्रिमूर्ती चौक परिसरात एका शोरूमबाहेर अशी गर्दी उसळली होती. मकरसंक्रांतीनिमित्त साड्यांवरील मोठ्या सवलतींच्या ऑफर्समुळे रविवारी आकाशवाणी ते त्रिमूर्ती चौक परिसरात थरार पाहायला मिळाला. ५ हजार रुपयांची साडी अवघ्या ५९९ रुपयांत मिळणार या बातमीने तब्बल १,००० हून अधिक महिला आणि मुलींनी एकाच वेळी दुकानावर गर्दी केली. या तुफान गर्दीत झालेल्या चेंगराचेंगरीत ३ महिला श्वास गुदमरून बेशुद्ध पडल्या, तर अनेक लहान मुलांची आईपासून ताटातूट झाल्याने परिसरात एकच घबराट पसरली.

त्रिमूर्ती रोडवरील या नवीन साडी सेंटरचे रविवारी उद्घाटन होते. गेल्या ३ महिन्यांपासून स्थानिक रीलस्टार्समार्फत १९९ ते ५९९ रुपयांमधील साड्यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केले जात होते. सकाळी १० वाजेपासूनच महिलांच्या रांगा लागल्या होत्या. ११ वाजता उद्घाटन होऊन दुकान उघडताच महिलांनी आत शिरण्यासाठी एकच गर्दी केली. काही वेळातच रस्ता पूर्णपणे जाम झाला आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. दुकानात महिलांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने स्थानिक नागरिकांनी पोलिसांना कळवले.

जवाहरनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सचिन कुंभार यांनी तातडीने पथकासह धाव घेतली. गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांनी माईकचा वापर केला. ''ही ऑफर केवळ आजपुरती नसून ३६५ दिवस राहणार आहे,' असे जाहीर केल्यानंतर आणि बळाचा वापर करण्याचा इशारा दिल्यानंतर दुपारी २ वाजता ही गर्दी निवळली. अनुचित प्रकार टाळला- सचिन कुंभार, पोलिस निरीक्षक गर्दीमुळे महिलांना श्वास घेण्यास अडथळा येत होता. संभाव्य मोठी चेंगराचेंगरी टाळण्यासाठी आम्ही तात्काळ दुकान बंद करण्यास लावले आणि महिलांना सुरक्षित बाहेर काढले. आम्ही रीतसर परवानगी घेतली होती, पण एकाच वेळी १ हजार महिला येतील अशी अपेक्षा नव्हती. ही सवलत वर्षभर सुरू राहणार असल्याने महिलांनी गर्दी करू नये.

# भागुजीराव ढेकळे विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

गेवराई। प्रतिनिधी

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए. एस. हे होते.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच जिल्ह्याच्या मा.खा.स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य थिटे म्हणाले की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले क्रांतीकारी विचारवंत आणि महिला सक्षमीकरणाच्या प्रणेत्या होत्या. त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षीका, मुख्याध्यापिका आणि खऱ्या अर्थाने स्त्रीमुक्ती, महिला सक्षमीकरण चळवळीच्या जननी होत्या. अंधश्रद्धा आणि जुनाट रूढी-परंपरेच्या विळख्यात अडकलेल्या देशाला मुक्त करण्यासाठी ज्ञानाशिवाय दुसरा पर्याय नाही हे त्यांनी ओळखले होते असे सांगून त्यांनी बालिकादिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे शाळेतील अनेक विद्यार्थींनी क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या वेशभुषेत राहिल्या. यावेळी पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, सर्व शिक्षक, शिक्षीका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेशकुमार पंडित यांनी केले तर सुत्रसंचालन चंद्रशेखर जामकर यांनी केले.

# अहिल्यानगर जिल्ह्यात कृषी निविष्ठा विक्रीमध्ये अनियमितता; ११ परवाने निलंबित

अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्ह्यात रब्बी हंगामात शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण कृषी निविष्ठांचा योग्य दरात पुरवठा व्हावा, यासाठी कृषी विभागाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहे. कृषी विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या तपासणीत निविष्ठा विक्रीत अनियमितता आणि लिंकींग करणाऱ्या पाथर्डीतील ३ व कोपरगावमधील ८ अशा ११ ठिकाणी कृषी विभागाने परवाने निलंबित केले आहेत. रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण कृषी निविष्ठांचा योग्य दरामध्ये पुरवठा होण्याच्यादृष्टीने जिल्ह्यात तालुकास्तरीय गुणनियंत्रण निरीक्षक आणि भरारी पथक यांच्यामार्फत तपासणी मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. या तपासणी अंती निविष्ठा विक्री केंद्रामध्ये त्रुटी, तसेच नियमबाह्य गोष्टी आढळल्यास कडक कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी दिलेले आहेत. त्यासोबतच पुर्ण तपासणी करुन विविध निविष्ठांचे नमुने काढणे, खत विक्री व्यवहार नोंदी, ज्यादा दराने खते विक्री, खतांची लिंकिंग असे प्रकार आढळल्यास संबंधितांवर कृषि निविष्ठा विक्री कायदे व नियम नुसार कारवाई करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

युरीया खताची वाढती मागणी व युरिया विक्रीमध्ये होत असलेल्या गैरप्रकाराच्या तक्रारी कृषि विभागास प्राप्त झालेल्या होत्या. त्या रोखण्यासाठी तसेच ई-पॉसवरील खत साठा व गोदामातील प्रत्यक्ष साठा या तफावत आढळून येत होती. त्यासाठी कृषि विभागाने जिल्हाभरात कृषि सेवा केंद्रांची तपासणी मोहिम व्यापक स्वरुपात राबविण्यात आली. जिल्हाभरात झालेल्या तपासणी मध्ये कृषि निविष्ठा कायदा, अत्यावश्यक अधिनियम तसेच परवाने अटी व नियमानुसार त्रुटी आढळलेल्या पाथर्डी ३, कोपरगाव ८ असे जिल्ह्यातील कृषि सेवा केंद्राच्या ११ परवान्यांवर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयात संबंधितांची सुनावणी घेऊन त्यांचे परवाने निलंबित करण्याचे आदेश बजावले आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्व कृषि सेवा केंद्र यांना कृषि निविष्ठा कायद्यांतर्गत असलेले नियम व अटी पाळुन शेतकऱ्यांना त्रास होणार नाही, अशा पध्दतीने कृषि निविष्ठा पुरवठा करावा, असे आवाहन सुधाकर बोराळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केलेले आहे.

# मुख्यमंत्री फडणवीसची सभा म्हणजे फक्त उमेदवार निवडून आणण्यासाठी

जालना । प्रतिनिधी

जालना शहर महानगर पालिका निवडणूक अनुषंगाने भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. परंतु ही सभा फक्त नगरसेवक निवडून आणण्यासाठीच आहे . जालना शहराचा विकास कोणी केला कसा झाला कसा केला भ्रष्टाचार कुठे झाला या सभेमधून सांगणे गरजेचे आहे असे काही तज्ञ मतदार राजा यांच्याकडून बोलल्या जात आहे. युती होणार आहे भाजप राष्ट्रवादी अजित पवार शिंदे गट शिवसेना प्रस्ताव गेला आहे यावरून दिसून येत आहे कोणी कोणाची फसवणूक केली यावरून दिसून येत आहे. जालना शहर एमआयडीसी कंपनीतील कंपनीच्या धुरामुळे संपूर्ण जालना शहर त्रस्त आहे हे मुख्यमंत्री यांना सांगण्याची गरज नाही हे सगळं दिसत आहे. म्हणून ही सभा फक्त नगरसेवक निवडून देण्यासाठी आहे. आणि ही सभा डॉ. फ्रेझर बोईज मैदान, जालना येथे सकाळी ११.३० वाजता होणार आहे.

या सभेला भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर, भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, आ. संतोष पाटील दानवे, महानगर पालिका निवडणूक प्रमुख तथा माजी आमदार कैलासजी गोरंट्याल, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, माजी आमदार विलास बापू खरात, सतीश घाडगे आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. सभेमध्ये मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे जालना महानगर पालिका क्षेत्रातील विकासकामे, आगामी नियोजन, पक्षाची दृष्टी आणि निवडणूक धोरण याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. तरी सर्व मतदार बंधु-भगिनी, नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टी, जालना महानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर महापालिका निवडणूक

## पाच बिनविरोध नगरसेवकांची माहिती निवडणूक आयोगाला सादर

अहिल्यानगर। प्रतिनिधी

अहिल्यानगर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत पाच नगरसेवक बिनविरोध निवडून आले असून त्यांच्या निवडीची केवळ औपचारिक घोषणा बाकी आहे. मात्र, राज्यभरात नगरसेवकांच्या बिनविरोध निवडीवरून आरोप-प्रत्यारोप सुरू झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने संबंधित महापालिकांकडून सविस्तर माहिती मागविली होती. त्यानुसार अहिल्यानगर महापालिकेच्या मुख्य निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी संपूर्ण माहिती राज्य निवडणूक आयोगाकडे सादर केल्याचे आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी महापालिका यशवंत डांगे यांनी सांगितले.

अहिल्यानगर महापालिकेचे पाच जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या बिनविरोध नगरसेवकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे कुमार वाकळे व प्रकाश भागानगरे, भाजपच्या पुष्पा बोरूडे, सोनाबाई शिंदे व करण कराळे यांचा समावेश आहे. या सर्वांच्या निवडीची अधिकृत घोषणा लवकरच करण्यात येणार आहे. बिनविरोध निवडीनंतर आता महापालिकेच्या उर्वरित ६३ जागांसाठी २८३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. निवडणूक अर्जांच्या छाननीदरम्यान शिवसेना (शिंदे गट) च्या पाच उमेदवारांचे अर्ज बाद ठरले होते. त्यानंतर अर्ज माघारीच्या प्रक्रियेत शिवसेना तसेच महाविकास आघाडीच्या काही उमेदवारांनी माघार घेतल्याने काही प्रभागांमध्ये बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. अहिल्यानगरप्रमाणेच राज्यातील अनेक महापालिकांमध्ये बिनविरोध निवडींचे प्रमाण वाढल्याने त्यावरून राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने सर्व महापालिकांच्या मुख्य निवडणूक निर्णय अधिकार्यांकडून बिनविरोध निवड झालेल्या उमेदवारांची सविस्तर माहिती मागविली होती. त्यानुसार अहिल्यानगर महापालिकेच्या निवडणूक निर्णय अधिकार्यांनी आवश्यक ती माहिती आयोगाकडे सादर केली असून पुढील कार्यवाही आयोगाच्या पातळीवर होणार आहे.

जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस.एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ९८/२०२५**

**ॲड. उबाळे एम.आर.**

**रेखा उमेश सारडेवाल वि. निरंक**

अर्जदार - १. रेखा भ्र.उमेश सारडेवाल, वय - ३९ वर्षे, धंदा-घरकाम रा. मारुती मंदिरा जवळ, लोनारपुरा पेठ बीड ता.जि.बीड, २. तेजस पि. उमेश सारडेवाल, वय-२१ वर्षे, धंदा-शिक्षण रा. सदर, ३. सागर पि. उमेश सारडेवाल, वय-१९ वर्षे, धंदा-शिक्षण रा. सदर, ४ गायत्री पि. उमेश सारडेवाल, वय-१२ वर्षे, धंदा-शिक्षण, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क. १, रा. सदर

गैरअर्जदार निरंक

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत उमेश पि. पांडुरंग सारडेवाल यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत उमेश पि. पांडुरंग सारडेवाल हे दिनांक २४/११/२०२४ रोजी सरकारी दवाखाना, बीड ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क्र. ४ ही मयताची मुलगी आहे. अर्जदार क्र. ४ ही अज्ञान असुन तिची अ.पा.क. आई अर्जदार क्र. १ ही आहे. त्यांचे शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे उमेश पि. पांडुरंग सारडेवाल या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे उमेश पि. पांडुरंग सारडेवाल रा. मारुती मंदिरा जवळ, लोनारपुरा पेठ बीड ता.जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख ०७/०२/२०२६

आज दिनांक १७/०१/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित
**क. लिपीक**

स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.

# दत्तनगर वस्तीशाळेवरील शालेय विद्यार्थ्यांना तात्काळ न्याय द्यावा : डॉ. गणेश ढवळे

बीड। प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील टाकरवन केंद्रीय जिल्हा परिषद शाळा अंतर्गत दत्तनगर वस्तीशाळेवरील शालेय विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याच्या निषेधार्थ आज सोमवार दि.०५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

दत्तनगर वस्तीशाळेसाठी २००७-०८ मध्ये सुसज्ज इमारत बांधण्यात आली असतानाही रस्त्यावर अतिक्रमण करून जाण्याचा मार्ग बंद केल्यामुळे गेल्या सव्वा दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांना लिंबाच्या झाडाखाली उघड्यावर शाळा भरवावी लागत आहे. या गंभीर बाबीकडे जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींचे वारंवार लेखी निवेदनाद्वारे लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (रा. लिंबागणेश) यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनात माहिती



आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,शेख मुबीन, रामधन जमाले, राजकुमार कदम डी.जी.तांदळे, नितिन जायभाये, डॉ.तांदळे, बाजीराव ढाकणे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे, राजेंद्र भिसे,शहाजी भुंबे,अंजाबापु अडागळे,कौसर कुरेशी,शालिंदा गरड,भारत भोमदळ, संतोष आडागळे,वचिष्ठ आठवे आदी पालक व ग्रामस्थ सहभागी होते.

आंदोलनादरम्यान ''जिल्हाधिकारी जागे व्हा'', ''पालकमंत्री अजितदादा जागे व्हा'', ''आ. विजयसिंह पंडित जागे व्हा'' अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

विद्यार्थ्यांना न्याय देण्यात दिरंगाई केल्याबद्दल संबंधित तहसीलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करावी, तसेच तात्काळ अतिक्रमण हटवून रस्ता खुला करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. या आंदोलनाचे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत पालकमंत्री अजित पवार व शिक्षणमंत्री दादा भुसे यांना देण्यात आले. आमच्या मुलांना न्याय द्या ; जिल्हाप्रशासनाचे दुर्लक्ष त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बसण्याची वेळ आली:- विलास कोरडे ( अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती) दत्तनगर वस्तीशाळेची विद्यार्थी पटसंख्या ३४ असून, त्याच इमारतीत अंगणवाडी चालते व तेथे ६४ बालकांची नोंद आहे. सध्या विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाक, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वीज व पंखे यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे. पालक व मुख्याध्यापकांनी वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाने दखल न घेतल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याची खंत शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास कोरडे यांनी यावेळी व्यक्त केली.

# तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी उप कालवा व्हावा- मनोज जरांगे पाटील

## आधुनिक तंत्रज्ञान व कृषी प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ –आ.विजयसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या मुख्य कालव्याला उप कालवे तयार करण्यात यावेत, अशी ठाम व कळकळीची मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली. आपला शेतकरी अत्यंत मेहनती असून तो रात्रंदिवस कष्ट करून शेती पिकवतो. मात्र योग्य पाणीपुरवठा व शेतमालाला हमीभाव मिळाल्यास शेतकरी अधिक सक्षम होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. हे उप कालवे झाल्यास गेवराई तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यातील शेतीला मोठा फायदा होईल. शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचेल, उत्पन्न वाढेल आणि शेतकरी कधीही आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेणार नाही, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. यासाठी आमदारांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करावा, अशी विनंती त्यांनी यावेळी उपस्थित आमदार विजयसिंह पंडित यांना केली.

यावेळी ११ शेतकऱ्यांना कृषीरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल मनोज जरांगे पाटील यांनी समाधान व्यक्त केले. पुरस्कार मिळालेले शेतकरी हे इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान असून त्यांच्या मेहनतीला मिळालेली ही पोचपावती आहे. अशा पुरस्कारांमुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो, असे त्यांनी सांगितले.दरम्यान, कार्यक्रमात बोलताना आ. विजयसिंह पंडित यांनी सांगितले की, पारंपरिक शेतीबरोबरच आधुनिक शेती, फळबागा, रेशीम शेती आणि नव्या तंत्रज्ञानाकडे शेतकऱ्यांनी वळणे ही काळाची गरज आहे. एआय व आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेऊन




कमी पाण्यात अधिक उत्पादन घेणे शक्य आहे, हे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी दाखवून दिले आहे. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून नवनवीन यांत्रिकीकरण, शेतीसाठी उपयुक्त अवजारे व आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पाहायला मिळत असल्याने शेतकरी नवे प्रयोग करत असून हे प्रयोग त्यांना आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत आहेत, असे त्यांनी नमूद केले.११ कृषीरत्न पुरस्कारांबाबत बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, आज पुरस्कार मिळालेले शेतकरी हे केवळ सन्मानाचे मानकरी नसून ते आधुनिक शेतीचे आदर्श उदाहरण आहेत. त्यांच्या यशामुळे इतर शेतकऱ्यांनाही नवी दिशा व प्रेरणा मिळेल. भविष्यात अशा अधिकाधिक शेतकऱ्यांचा सन्मान करण्यासाठी शासन व आयोजकांनी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.रेशीम शेतीला चालना देण्यासाठी जिल्ह्यात १५ कोटी रुपयांचा सिल्क पार्क प्रकल्प मंजूर झाला असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या रेशीम उत्पादनाला योग्य भाव मिळेल आणि उत्पन्नात लक्षणीय वाढ होईल, असा विश्वासही त्यांनी दिला. गेवराई येथे होणारे कृषी प्रदर्शन भविष्यात आणखी भव्य स्वरूपात व्हावे, अशी सदिच्छा व्यक्त करत आयोजक महेश बेदरे यांच्या उत्कृष्ट नियोजनाचे त्यांनी तोंडभरून कौतुक केले.

दरम्यान, किसान कृषी विकास प्रतिष्ठान, गेवराई यांच्या वतीने आयोजित कृषी प्रदर्शनात कृषीरत्न पुरस्कार वितरण व समारोप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास आ. विजयसिंह पंडित, मनोज जरांगे पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, अंतरवलीचे सरपंच पांडुरंग तारख, बाप्पासाहेब तळेकर, त्रिशुळ पाटील, अजय दाभाडे, राजेंद्र दादा आतकरे, राजेंद्र मोटे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.यावेळी मान्यवरांच्या हस्ते ११ प्रगतशील शेतकऱ्यांना कृषीरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश बेदरे यांनी केले, सूत्रसंचालन मयुरध्वज औटी यांनी केले तर समारोपप्रसंगी राजेंद्र मोटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पै.सतीश शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ७२ रक्तदात्यांनी केले रक्तदान!

## हक्काच्या नेत्यासाठी हक्काने ७२ कार्यकर्त्यांचे तर नेत्यांनीही केले रक्तदान!

आष्टी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला तर नेत्यांनीही यामध्ये रक्तदान करून कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले.

रक्तदान करून चालणार नाही ते गरजू पर्यंत पोहोचले पाहिजे आणि त्यासाठी हे रक्तदान आयोजित केले होते खऱ्या गरजूवंतांना रक्त योग्य वेळी मिळून त्यांचा जीव वाचला पाहिजे या हेतून दरवर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक जिल्हाध्यक्ष



सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित केला जातो याही वर्षी श्याम भाऊ माने मित्रपरिवार आष्टी तालुक्याच्या वतीने हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये ७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला तर सतीश आबा शिंदे यांनी देखील कार्यकर्त्यांसोबत या रक्तदान शिबिरात सहभाग घेतला स्वतः रक्तदान केले आणि रक्तदान हेच श्रेष्ठ दान आहे सांगून इतरांनाही वर्षातून एकदा तरी रक्तदान करा असे आव्हान केले. या शिबिरासाठी बीड जिल्हा राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, अण्णासाहेब चौधरी, शिवाजीआबा डोके, उपमहाराष्ट्र केसरी अक्षय शिंदे, सुनील दादा नाथ, विजय अण्णा गाढवे, असलम शेख, महादेव डोके, शिवाजी शेकडे, सरपंच बाळासाहेब गर्जे, राहुल काकडे, भाऊ घुले, रिजवान शेख, पत्रकार सचिन पवार, दिगंबर पोकळे, अर्जुन आबा पवार, सुग्रीव पवार, सागर खेंगट, बाळासाहेब मोरे, इरफान शेख, देवा मुटकुळे, जालिंदर नाना गायकवाड, रमेश दादा भोगाडे, योगेश मुटकुळे, अमोल

पान ३ वर

# बंधारे, रस्ते व पाझर तलाव दुरुस्ती करा अन्यथा तहसीलसमोर धरणे आंदोलन -माजी आ. भीमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदार संघात मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे बंधारे, नदीवरील पूल,रस्ते, पाझर तलावांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अद्यापही त्यांच्या दुरुस्तीची कामे सुरू झालेली नाहीत. या पार्श्वभूमीवर माजी आ.भीमराव धोंडे यांनी तहसीलदार आष्टी यांना पत्र देऊन ही कामे तातडीने दुरुस्त करावेत अन्यथा गुरुवार दि. ८ जानेवारी रोजी आष्टी तहसील कार्यालयासमोर या मागणीसाठी बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा माजी आ. भीमराव धोंडे यांनी दिला आहे.



आष्टी,पाटोदा व शिरूर (का.) या तीनही तालुक्यांत अतिवृष्टीमुळे अनेक बंधारे व पाझर तलाव उद्ध्वस्त झाले आहेत.याचा थेट परिणाम परिसरातील शेती व पाणी साठवण क्षमतेवर होत असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. मात्र या गंभीर विषयाकडे संबंधित प्रशासन व जलसंधारण विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप माजी आ. धोंडे यांनी केला आहे.महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर झालेल्या जलसिंचन व पाझर तलाव दुरुस्तीच्या कामांनाही अद्याप सुरुवात झालेली नाही.त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. प्रशासनाच्या दिरंगाई विरोधात संताप व्यक्त होत आहे.या सर्व बाबी लक्षात घेता, प्रशासनाने तातडीने लक्ष घालून पुढील दोन दिवसांत बंधारे, रस्ते,पाझर तलाव व जलसिंचन विहिरींची दुरुस्तीची कामे सुरू करावीत, अशी मागणी आ. भीमराव धोंडे यांनी केली आहे.जर ठरलेल्या मुदतीत कामांना सुरुवात झाली नाही तर गुरुवार दि.८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वा.आष्टी तहसील कार्यालया समोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.या पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी बीड,उपविभागीय अधिकारी पाटोदा, पोलीस अधीक्षक बीड व पोलीस निरीक्षक आष्टी यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# महरीन शिफा बिलाल चाऊस यांनी घेतला नगराध्यक्षपदाचा पदभार

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील नगराध्यक्षा पदाचा पदभार महरीन शिफा बिलाल चाऊस यांनी दि ०५ जानेवारी सोमवार रोजी दुपारी १:०० वाजता विवीध मान्यवरांच्या उपस्थितीत नगरध्याक्ष पदाचा पदभार स्वीकारला आहे.**

माजलगाव नगरपरिषदेच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नवनिर्वाचित नगरध्याक्षा महरीन शिफा बिलाल चाऊस यांनी दि ०५ जानेवारी सोमवार रोजी दुपारी १:०० वाजता नगरध्याक्षा पदाचा पदभार स्वीकारला.यावेळी माजी आमदार मोहनराव सोळंके, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के,माजी आमदार पृथ्वीराज साठे,बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे, मोहनराव जगताप,मानवी हक्क अभियानाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. डॉ.मिलींद आवाड, राष्ट्रवादी काँग्रेस



शरद पवार गटाच्या महिला जिल्हाध्यक्षा नशरीन बागवान मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.नवनिर्वाचीत नगरध्याक्षा महरीन शिफा बिलाल चाऊस यांना नगरध्याक्ष पदाचा पदभार नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी पदभार दिला.यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस यांनी आभार मानले

# वसुलीसाठी मल्टिस्टेट कर्जदारांवर गुन्हे दाखल करा

## विभागीय सहनिबंधकांनी घेतला ज्ञानराधा, साईराम , राजस्थानी जिजाऊसह सर्व मल्टिस्टेट प्रकरणांचा आढावा; ज्ञानराधाच्या १०७ जप्त प्रॉपर्टीच्या लिलावाच्या परवानगीसाठी विशेष कोर्टात प्रस्ताव दाखल

बीड । प्रतिनिधी

ज्ञानराधा, जिजाऊसह सर्व मल्टिस्टेट संस्थांच्या कर्जदारांकडून वसुली करण्यासाठी कोणतीही तडजोड न करता कडक कारवाई करा. सहकार्य न करणाऱ्या कर्जदारांवर वेळप्रसंगी १०१, १०५, १३८ कलमान्वये गुन्हे दाखल करण्याचे स्पष्ट आदेश लातूरचे विभागीय सहनिबंधक प्रवीण

पान ३ वर



### ज्ञानराधाच्या लिलावाचा प्रस्ताव दाखल

बहुचर्चित ज्ञानराधा मल्टिस्टेटच्या ८० प्रॉपर्टी ११ जुलै २०२५ रोजी, तर २७ प्रॉपर्टी २३ डिसेंबर २०२५ रोजी जप्त करण्यात आल्या आहेत. एकूण १०७ प्रॉपर्टींची किंमत तब्बल ५८.५४ कोटी रुपये आहे. तसेच जिजाऊ मॉसाहेब मल्टिस्टेटच्या २२.०१ कोटी रुपये किमतीच्या २६ प्रॉपर्टी ९ सप्टेंबर रोजी जप्त करण्यात आल्या आहेत. या दोन्ही मल्टिस्टेटच्या जप्त प्रॉपर्टीच्या लिलावासाठी विशेष कोर्टात परवानगी मागितली असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी सतीश सोनी यांनी दिली.

### प्रजासत्ताकदिनापूर्वी रास्तारोकोचा इशारा

जप्त केलेल्या प्रॉपर्टीच्या लिलावाची तारीख तात्काळ जाहीर करणे ही आमची मुख्य मागणी आहे. लिलावाची तारीख लवकर जाहीर झाली नाही, तर प्रजासत्ताकदिनापूर्वी सोलापूर–धुळे राष्ट्रीय महामार्गावरील महालक्ष्मी चौकात ठेवीदारांना घेऊन भव्य रास्तारोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांनी दिला. आंदोलनाच्या तयारीसाठी मराठवाडाभर दौरा करून ठेवीदारांच्या भेटी घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# कर्ता पुरुष गमावलेल्या डोंगरे कुटुंबाची ऊसतोड कामगार नेते केशवराव आंधळे यांनी घेतली भेट

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील डोंगरेयाची वाडी (सोन्नाखोटा) येथील ऊसतोड कामगार गणेश डोंगरे लातूर जिल्ह्यातील भाऊसाहेब बिराजदार साखर कारखान्याच्या ठिकाणी ऊस तोडणी साठी गेले होते ऊस वाहतूक करताना त्यांच्या अंगावर ट्रॉली कोसळली त्यात त्यांचा दुर्दैवी निधन झाले.एक हसतं खेळतं कुटुंब या अपघातामुळे आज उध्वस्त झाले आहे या अपघातामुळे गणेश डोंगरे यांचे आई-वडिल,पत्नी,चिमुकले लेकरं उघड्यावर आले आहेत या गंभीर दुर्घटनेची दखल महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांचे नेते तथा ऊसतोड





कामगार महामंडळाचे पहिले अध्यक्ष माजी आमदार केशवराव आंधळे यांनी घेतली आहे.

या अपघातामुळे एका कष्टकरी कुटुंबाचा आधारवड एका क्षणात कोसळला. घरचा कर्ता पुरुष हिरावून गेल्याने डोंगरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. मागे राहिल्या त्या तीन निरागस अल्पवयीन मुली, अश्रूंनी भरलेले डोळे आणि भविष्याबाबतची असुरक्षितता. मात्र अशा अडचणीच्या व काळोख्या क्षणी माजी आमदार केशवराव आंधळे यांनी पुढे येत या कुटुंबाच्या आयुष्यात आशेचा किरण पेरला आहे. त्यांनी डोंगरे कुटुंबाच्या दुःखात सहभागी होत तिन्ही मुलींना दत्तक घेण्याचा निर्णय घेत मुलींच्या संपूर्ण शैक्षणिक जबाबदारी स्वीकारून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले आहे.

महाराष्ट्राचे ऊसतोड कामगारचे नेते, गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाचे पहिले अध्यक्ष तथा भाजपाचे माजी आमदार केशवराव आंधळे यांनी घेतला आहे. मुलींच्या शिक्षणासाठी लागणारा सर्व खर्च, शैक्षणिक मार्गदर्शन, दैनंदिन गरजा आणि भविष्यासाठी आव शिक्षणात कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही. त्या केवळ शिकणार नाहीत, तर स्वाभिमानाने उभ्या राहतील,

पान ३ वर

# डॉ.ज्योती मेटे यांनी घेतल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

बीड । प्रतिनिधी

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसंग्राम प्रणित लोकनेते विनायकराव मेटे विकास आघाडीच्या वतीने इच्छुक उमेदवारांची महत्वपूर्ण बैठक दि. ५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता साक्षाळ पिंपरी ता. जि. बीड येथील श्री. नगद नारायण जिनिंग येथे पार पडली. या बैठकीत शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी स्वतः इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

या बैठकीस शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, नारायणराव काशीद, मराठवाडा अध्यक्ष अनिल घुमरे, सुहास पाटील, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोकाटे, जिल्हा उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे, सचिन कोटूळे, खरेदी




विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावळे, सुनील शिंदे,सुनील कुटे, मनिषा कुपकर, पंडित माने, ज्ञानेश पानसंबळ, माऊली शिंदे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिरूर, गेवराई व बीड तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या शिवसंग्रामच्या उमेदवारांचा सामाजिक सहभाग, संघटनात्मक कामगिरी, स्थानिक प्रश्नांची जाण, जनतेशी असलेला संपर्क तसेच पक्षविचाराशी असलेली निष्ठा या बाबींचा सखोल आढावा डॉ. ज्योती मेटे यांनी मुलाखतीदरम्यान घेतला. बैठकीत आगामी निवडणुकांची रणनीती, बूथस्तरीय संघटन मजबूत करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रश्न, शेतकरी, महिला, युवक व सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. लोकहिताचे प्रश्न प्राधान्याने मांडणारे, जनतेशी थेट संवाद साधणारे व संघटनेशी प्रामाणिक राहणारे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले जातील, असे स्पष्ट करण्यात आले.

# भजन कर मस्त जवानी में, बुढापा किसने देखा है..!

# भागवताचार्य प्रकाश महाराज साठे यांचा दिव्य संदेश

शिरूर । प्रतिनिधी

माणसाने देवाचे भजन हे तारुण्यातच केले पाहिजे, तारुण्यातच खरा भजनाचा आनंद माणसाला घेता येतो. वृद्धापकाळ मध्ये माणसाची अवयव साथ सोडतात मग भजन करणे दुरापास्त होते म्हणून माणसाने तारुण्याच्या मस्तीमध्येच देवाचे भजन केले पाहिजे भजन कर मस्त जवानी मे, बुडापा किसने देखा है भक्ती गीत गाऊन भागवताचार्य प्रकाश महाराज साठे यांनी उपस्थित भाविकांना दिव्य संदेश दिला आहे.

वैराग्याची महामेरु श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या जन्मभूमी मध्ये मौजे फुलसांगवी येथे महंत जनार्दन महाराज यांच्या प्रमुख



मार्गदर्शनाखाली गेल्या चार दिवसापासून भाऊंच्या पुण्यतिथीचा सुवर्ण महोत्सव सोहळा मोठ्या थाटामध्ये पार पडत आहे. यानिमित्ताने फुलसांगवी ग्रामस्थांच्या वतीने भागवताचार्य हभप. प्रकाश महाराज साठे यांच्या संगीत भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या तीन दिवसापासून ही कथा अगदी भक्तिमय वातावरणामध्ये पार पडत असल्यामुळे या ठिकाणी एका प्रकारचा आनंद उत्सवच पाहायला मिळत आहे.

पान ३ वर

### संगीत भक्ती गीतामुळे कथेला मोठा बहर

**भागवताचार्य प्रकाश महाराज साठे यांच्या भागवत कथेमध्ये भरभरून संगीताची मेजवानी भाविकांना श्रवण करायला मिळत आहे. संत वचनांना प्रभावित करणारी विविध भावगीते भक्ती गीते या कथेत गायले जात असल्यामुळे उपस्थित भाविक भक्त मंत्रमुग्ध होऊन अगदी आनंदाने डोलताना दिसत आहेत.**

# इकरा पब्लिक स्कूल येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील इकरा पब्लिक स्कूलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेख अब्दुल गनी सर होते.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी शाळेतील शिक्षकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेख परवीन मॅडम, नोमान सर, सादिया मिस, सुहाना मिस, अदिबा मिस आदी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या



जीवनकार्याविषयी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांचा पोशाख परिधान करून त्यांच्या जीवनावर, शिक्षणातील योगदानावर आणि स्त्री शिक्षणाच्या महत्त्वावर प्रभावी भाषणे सादर केली. तसेच विद्यार्थ्यांनी सुंदर चार्ट तयार करून वर्गखोल्या सजवल्या, ज्यामध्ये सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचे दर्शन घडले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व आणि समाजसुधारणेची प्रेरणा मिळाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार दि.०६ जानेवारी २०२६ । पान ७

# अजित दादा जनता खुळी नाही, चंद्रकांत पाटलांची पालकमंत्र्यांवर पुन्हा टीका

पुणे । प्रतिनिधी

पुणे : राज्यातील महापालिका निवडणुकांमध्ये आता सत्तेत एकत्र असलेले पक्षही आमने-सामने आल्याचं पाहायला मिळत आहे. त्यात, पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकांवरुन भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये सध्या जोरदार कलगीतुरा रंगला आहे. पिंपरी-चिंचवड आणि पुणे (झींपश) महापालिकेत अजित पवारांची राष्ट्रवादी विरुद्ध भाजप असा थेट सामना रंगतोय. त्यामुळे आरोपांना चांगलीच धार आली आहे. अजित पवारांनी भाजपचा भ्रष्टाचारी असा उल्लेख केल्यानं संतापलेल्या भाजपनं अजित पवारांवर तोफ डागली. अजितदादा, दमानं घेऊ नका आणि हलक्यात घेऊ नका. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री आमच्याकडे आहे हे विसरू नका असा थेट इशारा भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी दिला होता. आता, पुन्हा एकदा चंद्रकांत पाटील यांनी अजित



## २००१ पासूनचं सगळंच काढलं

पवारांवर टीका केली.

देवाभाऊ तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, असे म्हणत भाजप नेते तथा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री अजित पवारांवर जोरदार टीका केली. पुण्यातील महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने आयोजित प्रचारसभेत बोलताना पाटील यांनी अजित पवारांच्या कार्यकाळात पुण्यात आणि पिंपरी चिंचवडमध्ये काय विकास झाला, असा सवाल उपस्थित केला. तसेच, पुणे मेट्रो आणि उड्डाण पूल हे आमच्या काळात झाले. नगरपालिका निवडणुकीत आपण विजय मिळवला, आता १५ तारखेला मतदान करुन पुण्यात भाजपचा महापौर होणार आहे, असेही पाटील यांनी म्हटले. अजितदादा म्हणाले की, पिंपरी आणि पुण्यामध्ये विकास झाला नाही, मग अजित दादा अगोदर सत्ता तुमची होती, तेव्हा विकास का केला नाही. आता, महाविकास आघाडी विकास करायला पुढे आली आहे, असा खोचक टोला चंद्रकांत पाटील यांनी लगावला. अजित पवार अनेक वर्ष सत्तेत असताना आम्हाला प्रश्न विचारतात, पाच वर्षात तुम्ही काय केले? त्यांना अनेक कामांच्या यादी सांगता येतील, अजित दादा जनता खुळी नाही. उड्डाणपूल आणि मेट्रो करायला अजित दादा उशीर का झाला? मेट्रो आम्ही आणली, तुमची नुसती कागदावर राहिली. पुण्यात तुम्ही २००१ पासून २०१७ पर्यंत मेट्रो करू शकला नाहीत. तुम्ही आम्हाला विचारता काय केलं? मात्र आता जनता तुम्हाला विचारणार आहे, तुम्ही काय केलं? असा सवाल उपस्थित करत चंद्रकांत पाटील यांनी अजित पवारांना लक्ष्य केलं.

# खेडमधील राजगुरुनगर येथे भरदिवसा घरफोडी; ६८ लाखांचा ऐवज लंपास

खेड । प्रतिनिधी

राजगुरुनगर शहरातील होलेवाडीत शनिवारी (दि. ३) भरदिवसा घरफोडी करून चोरट्यांनी दागिने, रोकड आणि अन्य साहित्य असा एकूण ६८ लाख २ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी मोतीलाल कांतिलाल गदिया (वय ५९, रा. श्री अपार्टमेंट, पाबळ रस्ता, होलेवाडी, राजगुरुनगर) यांनी खेड पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदवली आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गदिया हे व्यावसायिक आहेत. शुक्रवारी (दि. २) रात्री संपूर्ण गदिया कुटुंब घर बंद करून सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी गेले होते.

शनिवारी दुपारी दीड वाजता शेजारी राहणाऱ्या महिलेने मोतीलाल गदिया यांना मोबाईलवरून संपर्क साधून घराच्या तीन दरवाजांची कुलपे तुटलेली असल्याचे सांगितले. त्यानंतर मोतीलाल यांच्या जवळच राहात असलेल्या बहिणीने घराची पाहणी केली असता कपाटे उघडी आणि सामान अस्ताव्यस्त पडलेले आढळले.त्यानंतर गदिया कुटुंब रात्री साडेनऊ वाजता घरी परतले असता चोरीची खात्री झाली. चोरट्यांनी घरातील कपाटे तोडून सोन्याचे हार, मंगळसूत्र, बांगड्या, चेन, बेसलेट, अंगठ्या, पेंडंट, चांदीची भांडी, घड्याळे आणि १० लाखांची रोकड चोरून नेल्याचे समोर आले. चोरीचा एकूण ऐवज अंदाजे ६८ लाख २ हजार रुपयांचा असल्याचे नमूद करण्यात आले आहे. गदिया यांच्या इमारतीभोवती असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले. त्यात दोन चोरटे रिकामे येऊन जाताना बॅग घेऊन जाताना दिसून येत असल्याचे पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी सांगितले. चोरट्यांनी शनिवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घरात प्रवेश केला व चोरी केली असा अंदाज आहे. खेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असून, चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

# लाखोंची कर थकबाकी असतानाही उमेदवारांना एनओसी? पालिकेच्या कर विभागावर संशय

पुणे: महापालिका निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू असतानाच महापालिकेच्या कर विभागाचा भोंगळ कारभार समोर आला आहे. लाखो रुपयांची कर थकबाकी असतानाही काही उमेदवारांना 'ना-हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) देण्यात आल्याचे उघड झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

शहरातील एका क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत हा प्रकार घडल्याची माहिती पुढे येत आहे. त्या कार्यालयांतर्गत काही उमेदवारांच्या नावावर २०१७ पासून आठ वर्षांची ३४ लाख ६५ हजार १६० रुपयांची कर थकबाकी नोंद आहे. अभय योजनेनुसार सवलत देऊनही जवळपास १६ लाख ८० हजार ७८७ रुपयांची थकबाकी अद्याप शिल्लक असल्याचे दस्तऐवजांत स्पष्ट दिसते. असे असतानाही संबंधितांनी महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले आणि छाननीदरम्यान ते पात्रही ठरल्याचे समोर आले आहे. या संदर्भात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विचारणा केल्यावर त्यांनी जबाबदारी कर विभागावर टाकल्याची माहिती मिळते. त्यामुळे दबावाखाली किंवा कोणत्या तत्त्वावर एनओसी देण्यात आले, याबाबत शंका




उपस्थित होत आहे.महाराष्ट्र महापालिका अधिनियमानुसार महापालिकेचा कर थकबाकीदार निवडणूक लढविण्यास अपात्र ठरतो. उमेदवारी अर्जासोबत वैध एनओसी जोडणे बंधनकारक आहे. चुकीची माहिती देऊन किंवा थकबाकी लपवून अर्ज दाखल केल्यास उमेदवारी रद्द करण्याची तरतूदही स्पष्ट आहे. अशा परिस्थितीत नियमांना वळसा घालण्यात आला असेल, तर हा अधिक गंभीर विषय ठरतो.या घडामोडींमुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. सामान्य करदात्यांकडून लहानशी थकबाकी असली तरी जप्ती, बँडबाजा आणि दंडात्मक कारवाई केली जाते; पण लाखोंची थकबाकी असलेले प्रभावशाली उमेदवार मात्र सूट मिळवत असल्याचा आरोप होत आहे. आम्ही वेळेवर कर भरतो, तर लोकप्रतिनिधी होऊ पाहणाऱ्यांसाठी वेगळे नियम का? असा सवाल सोशल मीडियासह राजकीय वर्तुळात जोर धरू लागला आहे.

### पालिका करणार चौकशी

दरम्यान, थकबाकी असतानाही एनओसी कशाच्या आधारे देण्यात आली, याची सखोल चौकशी होणार आहे. दोषी आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, असे महापालिकेचे कर विभाग उपायुक्त राम पवार यांनी स्पष्ट केले. आता या प्रकरणावर महापालिका प्रशासन व निवडणूक आयोग कोणती भूमिका घेतात, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

# मढेघाट हादरलं! विद्यार्थ्यांवर मधमाशांचा भीषण हल्ला; ५६ जण जखमी, ६ जणांची प्रकृती चिंताजनक

पुणे । प्रतिनिधी

ऐतिहासिक मढेघाट परिसरात पर्यटनासाठी आलेल्या शालेय विद्यार्थ्यांच्या ग्रुपवर मधमाशांनी अचानक भीषण हल्ला केला. हल्ल्यात एकूण ५६ जण जखमी झाले असून त्यापैकी सहाजणांची प्रकृती चिंताजनक असून त्यांना तातडीने पुण्यात खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले आहे. प्राथमिक उपचारानंतर इतर जखमींची प्रकृती स्थिर आहे, असे डॉक्टरांनी सांगितले.

दीड वर्षांपूर्वी जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ल्याजवळ मधमाशाच्या हल्ल्यात पर्यटक जखमी झाले होते. त्यानंतर ही जिल्ह्यातील दुसरी घटना आहे.ही घटना रविवार (दि.४) रोजी सकाळी



घडली. मढेघाट परिसरात १० ते १३ वयोगटातील ५६ विद्यार्थी, १० प्रशिक्षकांचा गट निसर्ग पर्यटनासाठी आला होता. दुपारी मधमाशांच्या मोहोळ उठल्याने त्यांनी ग्रुपवर हल्ला चढवला. त्यावेळी ग्रुपमध्ये विद्यार्थी, प्रशिक्षक हल्ल्याचा बचाव करण्यासाठी सैरावैरा पळत सुटले. मात्र, मधमाशाचा मोहोळ मोठा असल्याने यातील कोणाही सुटले नाहीत. वन विभाग, केळद येथील ग्रामस्थांनी प्रसंगावधान राखत मदतीसाठी धाव घेतली. जखमींना सुरक्षितस्थळी हलवून रुग्णवाहिकेपर्यंत पोहोचवले. जखमींना पासली येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तिथे डॉक्टर उपलब्ध नसल्याने वेल्हा येथील ग्रामीण रुग्णालयात ३५ जणांवर प्राथमिक उपचार केले. यात १७ मुले, १४ मुली आणि ४ ज्येष्ठांचा समावेश आहे. ६ जणांना तातडीने पुण्यातील भारती हॉस्पिटलमध्ये दाखल केले. २ मुले, १ मुलगी, २ पुरुष, १ महिला अशा सहाजणांची प्रकृती चिंताजनक आहे. बचावकार्यात धायरी, खेड शिवापूर, वेल्हा येथील '१०८' रुग्णवाहिकांनी कामगिरी बजावली.

मावळ भागातील '१८ गाव मावळ आपले महावितरण' या व्हॉट्सप ग्रुपने मदतीसाठी मोठी भूमिका बजावली. कर्मचारी सूर्यकांत नारायण शिंदे यांनी ग्रुपवर मदतीचे आवाहन केले. आवाहनाला प्रतिसाद देत अनेक ग्रामस्थ गाड्या घेऊन घटनास्थळी पोहोचले. जखमींना वेल्हा रुग्णालयात दाखल करण्यासाठी मदत केल्याने वेळेत जखमींवर उपचार केले.

# राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा सप्ताहानिमित्त गुडलक चौकात जनजागृती अभियान

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने डेक्कन वाहतूक विभागातर्फे आणि एमएमसीसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (छडड)



विभागाच्या सहकार्याने गुडलक चौक येथे जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा उद्देश वाहनचालकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता.

या अभियानादरम्यान छडड च्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा सप्ताहाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच वाहतुकीचे नियम, सिग्नल व्यवस्था, नो पार्किंग, वाहनचालक परवाना व इतर आवश्यक वाहतूक नियमांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांचे फलक हातात घेऊन गुडलक चौकातील सिग्नल परिसरात वाहनचालकांना संदेश देत नियम पाळण्याचे आवाहन केले. विशेष म्हणजे, हेल्मेट परिधान केलेल्या दुचाकीस्वारांचे गुलाबाचे फूल देऊन स्वागत करण्यात आले. यामुळे नियम पाळणाऱ्या वाहनचालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या जनजागृती अभियानात वाहतूक विभाग परिमंडळ २ येथील सहाय्यक पोलीस आयुक्त नंदिनी वग्यानी, डेक्कन वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक राहुल गौड, पोलीस उपनिरीक्षक मालुसरे, डेक्कन वाहतूक विभागातील अंमलदार, एमएमसीसी महाविद्यालयाचे सुमारे ४० एन एस एस विद्यार्थी, शिक्षक व प्राचार्य सहभागी झाले होते. सदर अभियान सकाळी ११.४५ ते १२.३० या वेळेत यशस्वीपणे पार पडले असून, याबाबतचा सविस्तर अहवाल वाहतूक मुख्य कार्यालयाकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती डेक्कन वाहतूक विभागातर्फे देण्यात आली आहे.

# काँग्रेसच्या संगीता तिवारी यांचा राजीनामा; राष्ट्रवादीत प्रवेश करण्याची शक्यता

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील महापालिकांच्या निवडणुकीच्या दृष्टीने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. मात्र यादरम्यान पुण्यात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसच्या माजी महिला उपाध्यक्ष संगीता तिवारी यांनी आपल्या सदस्यत्वाचा अधिकृत राजीनामा दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे सुपूर्द केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या विधानसभा निवडणुकीपासून संगीता तिवारी पक्षात नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. पक्षांतर्गत काही निर्णयांबाबत त्यांनी आपली असहमती दर्शवली होती. अखेर या त्यांनी काँग्रेसला जय महाराष्ट्र करत बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका निवडणुकांच्या तोंडावर त्यांचा राजीनामा हा काँग्रेससाठी मोठा फटका मानला जात आहे.

काँग्रेसचा राजीनामा दिल्यानंतर संगीता तिवारी आता कोणती नवी वाट निवडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. समोर आलेलया माहितीनुसार, त्या लवकरच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची दाट शक्यता आहे. त्या 'घड्याळ' हाती घेऊन आपल्या पुढील राजकीय प्रवासाला सुरुवात करतील, अशी चर्चा सध्या सुरू आहे. दरम्यान, संगीता तिवारी या पुण्यातील काँग्रेसचा एक महत्त्वाचा चेहरा मानल्या जात होत्या. महिला काँग्रेसमध्ये त्यांनी सक्रिय भूमिका बजावली आहे.

# मालकिणीच्या धमकावणीने ३० वर्षीय तरुणाची आत्महत्या; सात जणांवर

पुणे । प्रतिनिधी

मालकिणबाईंच्या धमकावणीमुळे रामदास भरत पवार ( ३०) या तरुणाने सातारा जिल्ह्यातील लोणंद परिसरात रेल्वेखाली आत्महत्या केली. याप्रकरणी दोन महिलांसह सातजणांविरुद्ध येवलेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.रामदासला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी शीतल काळे, अरविंद काळे, सतीश सरोदे, नितीन सरोदे, श्रृती कन्हेरे, ऋषी कन्हेरे, मोहन सोनार (सर्व रा. कोंढवा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याप्रकरणी पवार यांची बहीण रुपाली संतोष पुजारी ( ३३, रा. बाळासाहेबनगर, लोणंद, जि. सातारा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार,




रामदास हे येवलेवाडीतील शीतल ग्लॅमअप युनिसेक्स सलून येथे कारागीर म्हणून काम करत होते. सलूनची मालकीण शीतल काळे हिच्याशी त्यांचा वाद झाला होता. आरोपींनी पवार यांना पोलिसांकडे तक्रार करतो, अशी धमकी दिली. तक्रार देऊ नये यासाठी पवारकडे आरोपींनी पाच लाख मागितले होते.

आरोपींच्या त्रासाची पवार यांनी बहिणीला कल्पना दिली होती. आत्महत्येपूर्वी त्यांनी वही, तसेच समाजमाध्यमात आरोपींच्या त्रासामुळे आत्महत्या करत असल्याचे लिहून ठेवले होते. ३० डिसेंबर रोजी लोणंद रेल्वे स्थानक परिसरात धावत्या रेल्वेगाडीखाली उडी मारून आत्महत्या केली. पवार यांच्या बहिणीने पोलिसांत तक्रार दिली. सहायक पोलीस निरीक्षक थोरात तपास करत आहेत.

# पुणेकरांसाठी खुशखबर! हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोच्या 'त्या' चाचणीचा अडथळा दूर; लवकरच धावणार मेट्रो

पुणे । प्रतिनिधी

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो प्रकल्पाचे काम गतीने सुरू आहे. मेट्रो रेल्वेच्या सुरक्षितता व तांत्रिक मानकांची पडताळणी करणाऱ्या रिसर्च डिझाइन्स अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशनची (आरडीएसओ) ची अनिवार्य तपासणी नुकतीच यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. मेट्रो सुरू करण्यापूर्वीची ही तपासणी महत्त्वाची मानली जाते.माण-हिंजवडी ते शिवाजीनगर यांना जोडणारा एक महत्त्वाचा उपक्रम असलेल्या पुणे मेट्रो लाईन ३ प्रकल्पाचे काम अंतिम टप्यात आहे.

यापूर्वी या मेट्रोची चार स्टेशनपर्यंत चार ते पाच वेळा चाचणी घेण्यात आली. नुकत्याच झालेल्या आरडीओच्या




तपासणीमुळे ही मेट्रो कार्यान्वित होण्याच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचली आहे. प्रत्येक शहराची मेट्रो वेगवेगळ्या कंपन्यांनी बनवलेली असू शकते. हे नवीन तंत्रज्ञान भारतीय वातावरणात आणि ट्रॅकवर योग्यरित्या काम करेल, याची खात्री करण्याचे काम आरडीएसओ करते.भारतात धावणाऱ्या प्रत्येक मेट्रोची संरचना, डब्यांची रुंदी, ट्रॅकचे मोजमाप आणि वीज पुरवठा यंत्रणा ही सुरक्षित आहे की नाही, हे तपासण्यासाठी आरडीएसओकडे ठराविक मानके असतात. मेट्रो या मानकांवर उतरते की नाही, हे पाहणे आवश्यक असते. मेट्रोमध्ये दररोज हजारो नागरिक प्रवास करतात. वळणे, आपत्कालीन ब्रेक यंत्रणा आणि डब्यांची स्थिरता यांची कठोर चाचणी आरडीएसओद्वारे केली जाते. त्यांच्या प्रमाणपत्राशिवाय मेट्रो प्रवाशांसाठी सुरू करता येत नाही.मेट्रो जेव्हा रुळांवरून वेगाने धावते, तेव्हा तिची हालचाल मर्यादेत आहे की नाही हे तपासले जाते. आरडीएसओचे तज्ज्ञ अत्याधुनिक उपकरणांद्वारे या चाचण्या करतात. त्यामुळे ही तपासणी महत्त्वाची आहे.पीएमआरडीएने दिलेल्या माहितीनुसार, प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या मेट्रो गाड्यांच्या पुरवठ्यातही समाधानकारक प्रगती झाली आहे. आतापर्यंत १४ मेट्रो ट्रेनसेट्स प्राप्त झाले असून, मंजूर वेळापत्रकानुसार एकूण २२ गाड्या लवकरच उपलब्ध होणार आहेत. या गाड्यांच्या आधारे टप्प्याटप्प्याने चाचण्या, ट्रायल रन आणि पुढे नियमित प्रवासी सेवा सुरू करण्याची तयारी केली जाणार आहे. साधारपणपणे मार्च २०२६ पर्यंत या मेट्रोचे काही स्टेशनचे काम पूर्ण करून सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# पैसे आणले नसतील तर घरात येऊ नको', हुंड्यासाठी विवाहितेचा अमानुष छळ, सासरच्यांकडून बेदम मारहाण

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवडमध्ये हुंड्याच्या मागणीसाठी एका विवाहितेचा अमानुष छळ करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दापोडी पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या मंडळींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिलेचा विवाह २४ नोव्हेंबर २०२४ रोजी झाला होता. मात्र, लग्नानंतर अवघ्या महिन्यातच सासरकडून छळाला सुरुवात झाल्याचा आरोप तिने केला आहे. पती राजदीप, सासरे प्रदीप आणि सासू हेमलता यांनी छोट्या-छोट्या कारणांवरून शिवीगाळ करणे, उपाशी ठेवणे तसेच मानसिक आणि शारीरिक



त्रास देणे सुरू केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारीनुसार, शेअर मार्केटमध्ये झालेल्या तोट्याचे कारण देत सासरकडील मंडळींनी पीडितेकडे ५ लाख रुपयांची मागणी केली. या दबावाखाली विवाहितेला वडिलांकडून ३ लाख रुपये आणण्यास भाग पाडण्यात आले. इतकेच नव्हे तर दिवाळीच्या सणादरम्यान पुन्हा पैशांची मागणी करण्यात आल्याचेही तिने सांगितले.छळाच्या तीव्रतेमुळे पीडितेला १ ते २ महिने सासरी येऊ देण्यात आले नाही. त्यानंतर २१ डिसेंबर २०२५ रोजी ती सासरी परत आली असता, पैसे आणले नसतील तर घरात येऊ नको अशी धमकी देत घरात प्रवेश नाकारण्यात आला, असा गंभीर आरोप पीडित महिलेने केला आहे. तर सासरा प्रदीप याने पीडितेला बेल्टने बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे. पती राजदीपने बुक्के आणि लाथांनी मारहाण केली आणि सासू हेमलताने देखील मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेत पीडितेच्या शरीरावर गंभीर जखमा झाल्या असून, तिच्यावर उपचार करण्यात येत आहेत. या प्रकरणी दापोडी पोलीस ठाण्यात संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत. हुंड्यासाठी होणाऱ्या छळाच्या घटनांवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.